
दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता
मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)
मंगळवार ■ २१ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : ११८ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

# विकासाची तेजोमय दिवाळी!



**सुर्ये अधिष्ठीली प्राची ।**
**जगा जाणीव दे प्रकाशाची ।**
**तैसी श्रोतयां ज्ञानाची ।**
**दिवाळी करी ॥**
**- संत ज्ञानेश्वर**

**सूर्य उगवायचा अवकाश की सारे विश्व कसे प्रकाशाने भरुन जाते तसे या महापुरुषाची वाणी ही श्रोत्यांकरता ज्ञानाची दिवाळीच असते.**

संत शिरोमणी सद्गुरू ज्ञानेश्वर माउलींच्या चरणी नतमस्तक होऊन ठाणे जीवनदीपचा हा दिवाळी अंक आमच्या वाचकांसाठी सादर करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. मराठी जनांना आपल्या भावना, विचार मराठीतच व्यक्त करता याव्यात, लिहिता याव्यात, बोलत्या याव्यात, आपले मनोगत इतरांपुढे मांडता यावे, इतरांचीही मनोगते जाणून घेता यावीत, यासाठी आपण 'विकासाची नांदी पर्यावरणपूरक दिवाळी' हा विषय घेऊन या दिवाळी अंकाची मुहूर्तमेढ रोवली होती. अनेक वाचकांनी या विषयाचा धागा धरून आपले विचार जीवनदीपच्या दिवाळी अंकातून व्यक्त केले त्याबद्दल त्यांचे आभार. ज्या जाहिरातदारांनी जाहिरातीच्या माध्यमातून जीवनदीप वार्ता प्रति आपला ऋणानुबंध व्यक्त केला त्यांचेही मनापासून आभार

अंधाराचा नाश करून जीवनाला प्रकाशाकडे नेण्याचा संदेश घेऊन येणारा मंगल सण म्हणजे दिवाळी. आकाश कंदील, पणत्या, फटाक्यांची आतषबाजी, अंगणातल्या रांगोळ्या, फराळाचे ताट, पक्वांन्नांचे जेवण... आणि हो, वेगवेगळ्या विषयांवरील तऱ्हेतऱ्हेचे दिवाळी अंक...ही आपणा सर्व मराठीजनांची दिवाळीची कल्पना. दिवाळीत उत्साह, उल्हास, उत्सव हे तर सारे असतेच, पण या साऱ्यांवर कळस चढवतो तो दिवाळी अंकामुळे. म्हणूनच दिवाळी अंकाची खासियत काही औरच आहे. दरवर्षी प्रमाणे हा दिवाळी अंक आपल्याला सादर करण्याची ही सुसंधी आम्हाला प्राप्त झाली, ती केवळ आपणा सर्वांच्या आम्हांवरील निखळ प्रेमामुळे व निरपेक्ष जिव्हाळ्यामुळेच.

यंदाच्या दिवाळी अंकाला आपण 'विकास आणि पर्यावरण' हा विषय घेतलेला होता त्यामुळे विकासावर बोलणं क्रमप्राप्त आहेच. महाराष्ट्राच्या प्रगतीला पंतप्रधान नरेंद्र मोदींचा बळ नेहमीच मिळत आलं आहे व ते यापुढेही मिळत राहील यात शंका नाही. या वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित दादा पवार या व्यक्तींनी राज्याच्या विकासाला जे बळ दिलं आणि अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्पांची मुहूर्तमेढ केली ही केवळ प्रकल्पांची सुरुवात नाही तर विकसित महाराष्ट्राच्या दिशेने उचललेलं एक मोठं आणि दृढ पाऊल आहे. याचाच परिपाक म्हणून पर्यावरणाला कुठेही धक्का न लागता नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट, मुंबई आमदाबाद बुलेट ट्रेन, महानगरपालिकांमध्ये स्मार्ट सिटीच्या प्रकल्पांचा शुभारंभ, पाणी आणि कचऱ्याचे व्यवस्थापन, नवनवीन मेट्रो मार्गांचे जाळे असे अनेक विकासात्मक प्रकल्प दर महिन्याला राज्याला लोकार्पित होत आहेत त्यामुळे या वर्षीची दिवाळी महाराष्ट्राच्या इतिहासात विकासाच्या रकान्यात सुवर्णाक्षरांनी लिहिली जाईल.

तरुणांच्या कौशल्याला नवी दिशा, रोजगाराला नवी संधी : पंतप्रधान नरेंद्र मोदीजींची दूरदृष्टी आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा अथक पाठपुरावा... हे 'डबल इंजिन' सरकार विकासाचा नवा अध्याय लिहीत आहे. हे विकास प्रकल्प राज्याच्या स्वप्नांना मिळालेले नवे पंख आणि तरुणांच्या भविष्याला दिलेली नवी दिशा आहे. विकासाच्या सर्वच विषयांना स्पर्श करण्याचे ठरवले तरी ते शक्य झालेले नाही. त्यामुळे आपणा सर्वांना दीपावलीच्या आणि नूतन वर्षाच्या शुभेच्छा देऊन दैनिक ठाणे जीवनदीपचा हा दिवाळी अंक आपल्या हाती सुपूर्त करत आहोत. एकापरीने हा दिवाळी अंक म्हणजे धन्याचाच माल धन्यालाच दिल्यासारखे आहे...पण त्यातही खरा आनंद आहे.सर्व लेखक वाचक विक्रेते जाहिरातदार पत्रकार प्रतिनिधी हितचिंतक वितरक मुद्रक आणि आपल्या सर्वांना दिवाळीच्या पुन्हा एकदा हार्दिक शुभेच्छा!








महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ २१ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : ११८ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये


# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची अधिकाऱ्यांना दिवाळी भेट

- ४७ महसूल अधिकाऱ्यांना बढती
- २३ जणांना अपर जिल्हाधिकारी (निवड श्रेणी)
- २४ उपजिल्हाधिकारी झाले अपर जिल्हाधिकारी
- शासनाचे आदेश जारी

**दै . ठाणे जीवनदीप वार्ता**
**मुंबई : (रवींद्र घोडविंदे) :**

**दिवाळीच्या पर्वावर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील ४७ महसूल अधिकाऱ्यांना पदोन्नतीची भेट दिली आहे. यामध्ये २३ अधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी (निवड श्रेणी), तर २४ उपजिल्हाधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारी पदावर बढती देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, निवडश्रेणी मिळालेल्या अनेकांचा भारतीय प्रशासकीय सेवेत जाण्याचा मार्ग या निर्णयामुळे मोकळा झाला. आज सोमवार, (दि. २०) रोजी याबाबतचे शासन आदेश जारी केले. अनेक लोकाभिमुख योजना महसूल विभागाकडून राबविण्यात येत असून त्याची अंमलबजावणी करण्यामध्ये महसूली अधिकाऱ्यांचा मोठा वाटा असतो. त्यांच्या पदोन्नतीमुळे आणि बदल्यांमुळेही हा कामे अधिक गतीने होण्यास मदत होणार आहे. पदोन्नतीच्या पदाचा कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासूनच त्यांना नवीन वेतनश्रेणी लागू होईल.***

**दिवाळीचा आनंद द्विगुणीत**

**गेल्या अनेक वर्षांपासून अधिकाऱ्यांचा पदोन्नतीचा प्रश्न प्रलंबित होता. पदोन्नतीमुळे अधिकाऱ्यांमध्ये कामाचा उत्साह वाढतो आणि कामाला गतीही मिळते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पारदर्शक सरकार आणि गतिमान प्रशासन देण्याचा आमचा कायम प्रयत्न आहे. या बढतीमुळे अनेक अधिकाऱ्यांचा आयएएस होण्याचा मार्गही मोकळा झाला आहे. दिवाळीतच त्यांची पद्दोन्नती व्हावी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. अखेर या अधिकाऱ्यांचा दिवाळीचा आनंद द्विगुणीत करण्यात आम्हाला यश आले, अशी प्रतिक्रिया महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली.**

## पदोन्नती मिळालेले अप्पर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी)

- प्रज्ञा त्रिंबक बडे-मिसाळ (अध्यक्ष, जात पडताळणी समिती, नाशिक)
- किरण बापु महाजन (अध्यक्ष, जात पडताळणी समिती, नांदेड)
- रवीकांत कटकधोंड (खाजगी सचिव, मा. मंत्री, मत्स्यव्यवसाय व बंदरे)
- प्रदिप प्रभाकर कुलकर्णी (अध्यक्ष, जात पडताळणी समिती, गोंदिया)
- जगन्नाथ महादेव विरकर (सदस्य सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग)
- शिवाजी व्यंकटराव पाटील (विशेष कार्य अधिकारी, अपर मुख्य सचिव, महसूल, मंत्रालय, मुंबई)
- दीपाली वसंतराव मोतीयेळे (अध्यक्ष, जात पडताळणी समिती, भंडारा)
- संजय शंकर जाधव (अपर आयुक्त (सामान्य प्रशासन), अमरावती विभाग, अमरावती)
- प्रताप सुग्रीव काळे (अपर आयुक्त क्र. 1, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर)
- निशिकांत धोंडीराम देशपांडे (मा. राज्यपालांचे प्रबंधक, राजभवन, मुंबई)
- सुहास शंकरराव मापारी (प्रशासकीय अधिकारी, मा. मुख्यमंत्री कार्यालय)
- मोनिका सुरजपालसिंह ठाकूर (अतिरिक्त आयुक्त, (पिंपरी चिंचवड) महानगरपालिका, पुणे)
- स्नेहल हिंदूराव पाटील भोसले (निबंधक, सारथी, पुणे)
- मंदार श्रीकांत वैद्य (खाजगी सचिव, मा. मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल, मंत्रालय, मुंबई)
- सरिता सुनिल नरके (अध्यक्ष, जात पडताळणी समिती, सांगली)
- डॉ. राणी तुकाराम ताटे (अध्यक्ष, जात पडताळणी समिती, सोलापूर)
- मृणालिनी दत्तात्रय सावंत (सहयोगी प्राध्यापक, यशदा, पुणे)
- पांडुरंग शंकरराव बोरगांवकर (कांबळे) (अध्यक्ष, जात पडताळणी समिती, लातूर)
- नरेंद्र सदाशिवराव फुलझेले (अध्यक्ष, जात पडताळणी समिती, बुलढाणा)
- सुषमा वामन सातपुते (अध्यक्ष, जात पडताळणी समिती, कोल्हापूर)
- अरूण बाबुराव आनंदकर (अतिरिक्त महासंचालक, महाऊर्जा, पुणे)
- रिता प्रभाकर मेत्रेवार (अपर आयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर)
- वंदना साहेबराव सूर्यवंशी (अध्यक्ष, जात पडताळणी समिती, जालना)
- पदोन्नती झालेले अप्पर जिल्हाधिकारी पुढीलप्रमाणे
- मारुती भिकाजी बोरकर - अपर जिल्हाधिकारी, बार्टी, पुणे
- श्रावण श्रीरंग क्षीरसागर - अपर जिल्हाधिकारी, परभणी
- राजेंद्र मारुती खंदारे - प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई (प्रपत्र पदोन्नती)
- हेमंत विठ्ठल निकम - उप संचालक, भूमि अभिलेख, जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे (श्री राजेंद्र गोळे यांच्या बदलीने रिक्त

### पदावर

- अविनाश हरिश्चंद्र रणखांब - खाजगी सचिव, मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद (प्रपत्र पदोन्नती)
- तुकाराम देवराम हुलवळे - अपर जिल्हाधिकारी, सिडको, नवी मुंबई
- अविनाश दशरथ शिंदे - प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, नागपूर विभाग, नागपूर
- सुदाम अमरसिंग परदेशी - उपायुक्त (रोहयो) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक
- निलेश चंद्रकांत जाधव - सह आयुक्त (करमणूक) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक
- सुजाता प्रितम गंधे-क्षीरसागर - सक्षम प्राधिकारी, मुंबई-नागपूर, झारसुगुडा पाईप लाईन प्रकल्प, भूसंपादन, नागपूर (प्रपत्र

### पदोन्नती

- रत्नदिप रामचंद्र गायकवाड - अपर जिल्हाधिकारी, नांदेड
- नितीनकुमार भिकाजी मुंडावरे - अपर जिल्हाधिकारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
- विजया विनायक बनकर - उपायुक्त (पुनर्वसन) विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर
- अंजली अभयकुमार धानोरकर - सह आयुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगर प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर
- नंदकुमार माधव कोष्टी - उपायुक्त (पुनर्वसन) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे (श्री विकास गजरे यांच्या बदलीने रिक्त पदावर)
- सतिश ज्ञानदेव राऊत - अपर जिल्हाधिकारी, पुणे
- अजय उत्तम पवार - अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, मुंबई
- रमेश कारभारी मिसाळ - अपर जिल्हाधिकारी, जालना
- अभिजित भालचंद्र घोरपडे - संचालक, राज्य वातावरणीय कृती कक्ष (पद उन्नत करून)
- अजित प्रल्हाद देशमुख - खाजगी सचिव, मा.मंत्री, (को.रो.उ.ना) (प्रपत्र पदोन्नती)
- गणेश केशव नि-हाळी - अपर जिल्हाधिकारी, सोलापूर
- संजय बाबुराव तेली -अपर जिल्हाधिकारी, वर्धा
- वासंती मारुती माळी - सह आयुक्त (करमणूक), विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती (श्री संतोष भोर यांच्या बदलीने रिक्त

### पदावर

- संदीप जयवंतराव कोकडे-पवार - प्रकल्प संचालक, जलजीवन मिशन, बेलापूर नवी मुंबई

---

शेकडो महिला कार्यकर्त्यांसह

# अश्विनी धारवे (राऊत) यांचा भाजपात प्रवेश



**देशाचे यशस्वी पंतप्रधान आदरणीय श्री. नरेंद्रजी मोदी साहेब, राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब, तसेच प्रदेशाध्यक्ष मा. श्री. रविंद्र चव्हाण साहेब यांच्या प्रेरणेतून आणि माझ्या नेतृत्त्वावर विश्वास ठेवून मुरबाड विधानसभा मतदारसंघात सुरू असलेल्या विविध विकासकामांबाबत विश्वास व्यक्त करत सौ. अश्विनी समीर धारवे (राऊत) यांनी आपल्या शेकडो महिला कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे.**
**- किसन कथोरे आमदार मुरबाड विधानसभा**

**दै . ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूर** : अश्विनी धारवे (राऊत) यांनी शेकडो महिला कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. या पक्ष प्रवेशामुळे बदलापूर शिरगांव परिसरातील भारतीय जनता पक्षाची संघटनात्मक ताकद अधिक बळकट झाली असून, जनतेच्या विकासाच्या ध्येयासाठी महिला वर्गाचा मोठ्या प्रमाणावर सहभाग वाढत आहे. या प्रसंगी सर्व नवीन कार्यकर्त्यांचे आमदार किसन कथोरे यांनी भारतीय जनता पक्षात सहर्ष स्वागत केले. तसेच पुढील पक्ष कार्यात सक्रिय सहभागासाठी हार्दिक शुभेच्छा दिला. बदलापूर शहराची नगरपालिका भ्रष्टाचारमुक्त करण्याचा निर्धार भारतीय जनता पक्षाने घेतला आहे. आगामी निवडणुकांमध्ये भाजपा-राष्ट्रवादी आघाडीची सत्ता नगरपालिकेवर येईल आणि नगराध्यक्ष भारतीय जनता पक्षाचा बसणार, असा ठाम विश्वास व्यक्त या पक्ष प्रवेशाच्या कार्यक्रमात व्यक्त करण्यात आला.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com

# आनंदाचे गाणे गात ...
# आली दिवाळी अंगणात ........



**भुई नळयांचे झाड फुलांचे**
**भिडे निळया आभाळी**
**आली उधळीत हासत फुलविते**
**लक्ष दीप दीपावली रे**

सर्व सणांचा राजा असणारी दिवाळी या नावातच आनंद आहे, उत्साह आहे. शरद ऋतूतील चैतन्यमय वातावरण घेऊन येणाऱ्या दिवाळीचे वेध दसऱ्यापासूनच लागतात. दीपावली हा संस्कृत शब्द असून त्याचा अर्थ दिव्यांची रांग. तसाच तो प्रकाशाचा हिंदू सण आहे. अंधारावर प्रकाशाचा, वाईटावर चांगल्याचा आणि अज्ञानावर ज्ञानाच्या विजयाचे प्रतिक म्हणून या सणाला ओळखले जाते. हे आपल्या जीवनातून गडद सावल्या, नकारात्मकता आणि शंकांचे निमूर्लन चिन्हांकित करते. हा सण स्पष्टतेने आणि सकारात्मकतेने आपल्या गाभ्यांना प्रकाशित करण्याचा संदेश देते. दिवाळीचे दिवस म्हणजे नातेवाईकांच्या भेटीगाठी, भेटवस्तुंची देवाणघेवाण, नवीन कपड्यांची आणि आधुनिक फटाक्यांची खरेदीची लगबग असते. घरोघरी दिवाळी फराळांचा घमघमाट सुटलेला असतो. मिठाई आणून सर्वांची दिवाळी गोड केली जाते. दिवाळी हा असा एकमेव सण आहे की तो लहानांपासून ते वयोवृध्द लोकांसाठी आनंदाचा दिवस असतो. वाईट प्रवृत्तींना दूर पाठवणाऱ्या दारासमोरील शुभसूचक रांगोळ्या, सर्वांचे लक्ष वेधून घेणारा चमकणारा आकाशदिप तसेच अंधार दूर करून पहाटेच्या वेळेची सुंदरता वाढवणाऱ्या पणत्यांची रांग पाहून मन प्रसन्न होते. हा सण साधारणपणे चार ते पाच दिवस साजरा केला जातो. दिवाळी ही विविध धार्मिक कार्यक्रम, देवता आणि व्यक्तीमत्वाशी जोडली गेलेली आहे. इतर प्रादेशिक परंपरा या सणाला विष्णू, कृष्ण, शिव, काली, हनुमान, कुबेर, यम यमी, धन्वंतरी यांच्याशी जोडतात. प्रामुख्याने हिंदू सण असला तरी दिवाळी विविध प्रकारे इतर धर्माचे लोक देखील साजरी करतात. जैन लोक त्यांची स्वतःची दिवाळी करतात. जी महावीरांच्या अंतिम मुक्तीचे प्रतिक आहे. मुघल तुरुंगातून गुरु हरगोविंद यांची सुटका झाल्याबद्दल शीख लोक सण साजरा करतात. नेवार बौध्द हे इतर बौध्दांच्या विपरीत लक्ष्मीची पूजा करून दिवाळी साजरी करतात. दिवाळी पहाट ही संगीत मैफलीने, मनोरंजनाचे कार्यक्रम किंवा नृत्य सादरीकरणाच्या कार्यक्रमाने केली जाते. हा दिवस फिजी, गयाना, मलेशिया, सिंगापूर, श्रीलंका, त्रिनिदाद आणि टो बॅगो येथे मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. दिवाळीत किल्ल्याची प्रतिकृती करुन इतिहासाची साक्ष दिली जाते. युवा पिढीने किल्ल्याचे रक्षण करणे हा त्यामागील हेतु असतो, घरोघरी सगळीकडे साजरा होणारा दिवाळीतील महत्वाचा दिवस लक्ष्मीपूजन होय. दीपावली हा सण दोन युगांशी म्हणजेच 'सत्ययुग' आणि 'त्रेता युग' याच्याशी जोडलेला आहे. सत्य युगात समुद्र मंथनातून माता लक्ष्मी या दिवशी प्रगट झाली होती. भगवान श्री राम सुध्दा त्रेता युगात याच दिवशी अयोध्येला पोहोचले होते. त्यावेळी अयोध्यावासियांनी लक्षावधी दीप प्रज्वलीत करून आपल्या भगवंताचे स्वागत केले.

**दिवाळी हा हिंदूंचा प्रमुख सण आहे. याला दिव्यांचा सण असेही म्हणतात. या दिवशी प्रभू राम, माता सीता आणि लक्ष्मण अयोध्येला परतल्याचा आनंद साजरा करण्यासाठी दिवे लावले जातात. लोक आपली घरे स्वच्छ करतात, सजवतात आणि रात्री दिवे लावतात. मिठाई वाटून फटाके फोडले जातात. लक्ष्मीपूजनाने सुख-समृद्धीची कामना केली जाते. हा सण सर्वांना एकतेचा आणि आनंदाचा संदेश देतो. महाराष्ट्रात हा सण मोठ्या उत्साहाने केला जातो.**

आजकालच्या थकाधकीच्या जीवनात बऱ्याचदा या सणांचा आनंद घेण्यासाठी पर्यटन स्थळाला भेट देतात आणि नवा उत्साह घेऊनच परततात. ठाण्यातील राम मारुती रोड येथे तरुणाईची दिवाळी आगळीवेगळी असते. फटाक्यांची आतषबाजी यावेळी पाहायला मिळते. तसेच तलावपाळी वरील दिव्यांची मनमोहक रोषणाई बघून डोळयांचे पारणे फिटते. वाचन प्रेमींना दिवाळी अंकांच्या माध्यमातून दिवाळीच्या खास मेजवानीचा आनंद भरभरुन घेता येतो. घरोघरी दिसे दिव्यांची रोषणाई अनुभवूया सगळे दीपावलीची अपूर्वाई

**ही दिवाळी सर्वांना,**
**सुखाची, समृद्धीची,**
**नव चैतन्याची,**
**भरभराटीची जावो.**

**लेखिका**
**- लीना बल्लाळ, ठाणे**
**(९९२०५२४४२४)**






दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com

# कल्याणात छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाची स्वच्छता,पूजन आणि दीपप्रज्वलन

**दै . ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : खडेगोळवली परिसरातील शिवरत्न चौक परिसरात असलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे ऐतिहासिक "जिरे टोप" स्मारक हे या भागातील एकमेव स्मारक म्हणून ओळखले जाते. या स्मारकाची दिवाळीच्या पहिल्या दिवशी भक्तिभावाने स्वच्छता करून, पूजन तसेच दीपप्रज्वलन करून दिवाळीचा प्रारंभ करण्यात आला. त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराज चौकातही सदर मोहीम राबवून शिवरायांना मानवंदना देण्यात आली.स्थानिक नागरिक आणि



शिवप्रेमींच्या उपस्थितीत झालेल्या या उपक्रमादरम्यान "पुण्यश्लोक छत्रपती श्री शिवाजी महाराज" यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. उपस्थितांनी महाराजांप्रती कृतज्ञता व्यक्त करताना सांगितले की, "आज आपण हिंदू म्हणून जिवंत आहोत ते शिवराय आणि त्यांच्या मावळ्यांनी सांडलेल्या रक्तामुळेच. आपल्या संस्कृतीतील देवळातील देव, तुळशीचे स्थळ, महिलांच्या कपाळीचे कुंकू आणि आपल्या सण-उत्सवांची परंपरा सर्व शिवरायांच्या प्रेरणेतून आजही जपली जाते." दिवाळीचा पहिला दिवा हिंदुस्थानाच्या भाग्यविधात्या, धर्मसंरक्षक आणि राष्ट्रदोलनाचे प्रतीक असलेल्या छत्रपती श्री शिवाजी महाराजांना अर्पण करत त्यांच्या स्मृतींना वंदन करण्यात आले. कार्यक्रमात स्थानिक नागरिकांसह युवकांनी उत्साहाने सहभाग घेतला होता.

## शिवसेना उपशहर प्रमुख मेघन सल्पी यांच्या प्रयत्नाने गृहसंकुलांना बाकडे भेट

**दै . ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : दिवाळीच्या धनतेरस या पहिल्या दिवशी कल्याण मधील पॅनल क्रमांक ८ कृषी बाजार समिती येथील आदेश्वर पार्क, देवआशिष, देवदर्शन आणि आशिया अल्टीस या सोसायटी मध्ये कल्याण पश्चिमचे शिवसेना शिंदे समर्थक आमदार विश्वनाथ भोईर यांच्या निधीतून आणि युवासेना उपशहरप्रमुख मेघन सल्पी यांच्या प्रयत्नाने त्या सोसायटीच्या मागणीनुसार त्यांना बसण्यासाठी बाकडे देण्यात आले. गृहसंकुलांना बाकडे दिल्याने येथील नागरिकांना विरंगुळा होण्यासाठी मदत मिळणार आहे. यावेळीस सोसायटीतील रहिवासी आणि काही शिवसेना भाजपा या पक्षाचे कार्यकर्ते व ज्येष्ठ कार्यकर्ते उपस्थित होते. सर्व कार्यकर्त्यांनी आमदार विश्वनाथ भोईर आणि युवासेना उपशहर प्रमुख मेघन सल्पी यांचे आभार व्यक्त केले. त्यावेळेस उपस्थित असलेले भाजपा कायदा आघाडी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष ॲड. समृद्ध ताडमारे, बैलबाजार वॉर्ड अध्यक्ष भावेश ढोलकिया, आर्किटेक्ट नयन ढोलकीया, भाजपा दिव्यांग आघाडी संयोजक मिलिंद मेहता, रामचंद्र बाबडे, संकेत बाबडे, संजय लोखंडे, किशोर तिवरे, विनायक पवार, कैलास चौधरी, सागर गुडदे, रघुनाथ भोई, भावना गोसर आदी सोसायटी कमिटी मेंबर, शिवसेना भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते स्थानिक नागरिक उपस्थित होते.

## समन्वय प्रतिष्ठान तर्फे कातकरी वाडीत दिवाळी फराळ वाटप

**दै . ठाणे जीवनदीप वार्ता/कल्याण :** दिपावली हा सण रोषणाईत, फटाक्यांची आतिषबाजी करुन तसेच नवनविन वस्तूंची खरेदी करुन साजरा करण्यात येतो. असा हा पारंपारीक दिपोत्सव प्रत्येक घरात आपल्या आर्थिक क्षमतेनूसार साजरा होत असतो. या सणानिमित्त रविवारी मुरबाड तालूक्यातील कातकरी वाडी, काकडपाडा या कातकरी वाडीतील ३० कुटूंबियांना दिवाळी फराळ, महिलांना नविन साडया, कपडे वाटप कार्यक्रमाचे आयोजन समन्वय प्रतिष्ठान, कल्याण तर्फे करण्यात आलेले होते.दरम्यान बहुतांशी आदीवासी समाज शहरापासून दूर असलेल्या ग्रामीण परीसरातील जंगलतात वास्तव्यास असल्याने तेथिल नैसर्गिक साधन संपतीचे जतन व संवर्धन करण्यास आदीवाशी समाजाने पुढाकार घेऊन पर्यावरणाचे संरक्षण केले पाहिजे असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष मंगेश मोहळ यांनी व्यक्त केले.यावेळी संस्थेचे संस्थापक ॲड जनार्दन टावरे, सचिव संतोष खेताडे, आयोजक रसिक महाडीक, संस्थेचे पदाधिकारी तसेच वाडीतील स्थानिक रहीवाशी, दिलीप शिंद उपस्थित होते.

## नृत्यगंधने डोंबिवलीकर रसिकांना केले मंत्रमुग्ध

### दिवाळीनिमित्त श्री गणेश मंदिर संस्थानचे आयोजन




**दै . ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : श्री गणेश मंदिर संस्थान डोंबिवली तर्फे गेली अनेक वर्ष दिवाळी निमित्त आप्पा दातार चौक, डोंबिवली पूर्व येथे युवा भक्ती -शक्ती दिन साजरा केला जातो. त्या अनुषंगाने विविध नृत्य संस्थांचे कार्यक्रम राबवले जातात. सोमवारी दिवाळीच्या पहिल्या दिवशी सकाळी अलंकार नृत्यालय, पल्लवी नृत्यनिकेतन संस्था, नृत्य साधना निकेतन प्रस्तुत पारंपरिक नृत्य अविष्काराचा सुमारे 95 कलाकारांसह " नृत्यगंध " ह्या गणेश मंदिर संस्थान आयोजित कार्यक्रमाने रसिक प्रेक्षकांची वाहवा मिळवली. तसेच विश्व विक्रमी नोंद संपन्न असणाऱ्या डॉ. अक्षय कुलकर्णी ह्यांच्या शंख वादनाने या कार्यक्रमाला एक अद्वितीय अनभुती प्राप्त झाली.

या कार्यक्रमास खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार राजेश मोरे, पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे, रामनगर पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जायदवाड, शिवसेना उपजिल्हा प्रमुख राजेश कदम,श्री गणेश मंदिर संस्थान अध्यक्ष अलका मुतालिक, सचिव प्रवीण दुधे, संजय कानिटकर, खजिनदार गौरी खुंटे, मंदार हळबे, श्रीपाद कुलकर्णी आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमासाठी गणेश मंदिर संस्थान समिती सदस्य सुनिला पोतदार आणि सायली शिंदे यांनी समर्पक निवेदन केले तर दिपाली काळे आणि वृषांक कवठेकर यांचे सहकार्य मिळाले. तर यंदा प्रथमच पोलिस आयुक्तालय ठाणे यांच्या वतीने पोलिस पथकाने देशभक्ती गीतांवर आधारित वादन करून कार्यक्रमाचा समारोप केला.

## 'कुष्ठरुग्णांकडे पाहण्याचा दृष्टीकोन आजही संकुचितच'

**दै . ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : या कुष्ठरोग निवारण समितीच्या इस्पितळात अनेक वर्षे रुग्ण राहिल्यावरही त्यांच्याकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन हा कलुषितच असून अनेकदा त्यांच्या नातेवाईकांनीही या रुग्णांशी संबंध तोडल्याचे आढळत असल्याची खंत शांतिवन, नेरे येथील या समितीचे चेअरमन ॲड. प्रमोद ठाकूर यांनी व्यक्त केली. 'श्री गजानन महाराज भक्त मंडळ, वाशी' तसेच 'युथ कौन्सिल नेरुळ' या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी आयोजित दिवाळी फराळ वाटप व जीवनोपयोगी चीजवस्तूंच्या वितरण, दिवाळी अंक तसेच ब्रेल लिपीतील पुस्तकांच्या प्रकाशन प्रसंगी ठाकूर बोलत होते. या वेळी विचारमंचावर ज्येष्ठ कन्सल्टिंग सर्जन डॉ.अरुण रानडे, ब्रेल पुस्तकांचे लेखक व दै. 'आपलं नवे शहर'चे उपसंपादक राजेंद्र घरत, आर सी एफ च्या मुख्य महाव्यवस्थापक नंदा कुलकर्णी, 'जॉय ऑफ गिव्हिंग' संस्थेचे संस्थापक गणेश हिरवे, 'ज्येष्ठ नागरिक संघा'च्या रुग्णसेवा केंद्राचे अध्यक्ष रणजीत दिक्षित,'श्री गजानन महाराज भक्त मंडळा'चे उपाध्यक्ष शिवाजीराव शिंदे, पत्रकार वैभव पाटील हे उपस्थित होते. १२२ एकरात पसरलेल्या या 'कुष्ठरोग निवारण समिती'च्या कामाला योग्य ते सरकारी पाठबळ मिळत नाही तसेच या जागेवर अनेकांचा डोळा असून कदाचित त्या जागेच्या रक्षणासाठी भविष्यात संघर्ष




करावा लागेल असेही ठाकूर यांनी यावेळी सांगितले.

या प्रसंगी 'जॉय' या गणेश हिरवे संपादित दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले. दै. 'आपलं नवे शहर'चे उपसंपादक राजेंद्र घरत यांनी लिहिलेल्या 'दृष्टीआड सृष्टी' आणि 'शाली आणि माली' या ब्रेल लिपीतील त्यांच्या एकोणतिसाव्या व तिसाव्या पुस्तकांचे प्रकाशनही यावेळी पार पडले. शरीराचा कुष्ठरोग एकवेळ औषधांनी बरा होईल; पण मनाच्या कुष्ठरोगाचे काय करणार? असा प्रश्न यावेळी केलेल्या भाषणात उपस्थित करुन लांब पल्ल्यांच्या गाड्यांमध्ये चोर, डाकू, दरोडेखोर, लुटारु, भामटे बिनबोभाट प्रवास करतात; मात्र कुष्ठरोग्यांकडे मात्र अशा प्रवासात तिरस्कृत नजरेने पाहिले जाते असे सांगत आपल्या डोळ्यावर अलीकडेच करण्यात आलेल्या शस्त्रक्रियेचा संदर्भ देत घरत म्हणाले की अंधांना किती व कसकशा समस्यांना सामोरे जावे लागते त्याचा अंशतः अनुभव आपल्याला त्यानंतरच्या काळात घेता आला. ब्रेल लिपीतील पुस्तकांसाठी लेखन करताना तो उपयोगी ठरल्याचेही त्यांनी नमूद केले.

वृध्दाश्रम व अनाथाश्रम हे जवळजवळ असावेत; जेणेकरुन वृध्दांना नातवंडांच्या भेटीचा आनंद घेता येईल अशी अपेक्षा यावेळी ज्येष्ठ सर्जन डॉ.अरुण रानडे यांनी व्यक्त केली. कट, कमिशनच्या प्रस्थापित रचनेत आपण बसत नसल्याने २७ वर्षे चालवलेले हॉस्पिटल बंद करुन अन्य पर्याय अवलंबले असल्याचे सांगून डॉ. रानडे म्हणाले की बालकांना चांगल्या, सत्वयुक्त अन्नापेक्षा चटपटीत, आजारांना कारण ठरणारे अन्न खाण्याची सवय लागली आहे, ती तोडायला हवी. यावेळी डॉ. रानडे यांच्या पंच्याहत्तरीनिमित्त 'जीवन गौरव पुरस्कार' देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. नंदा कुलकर्णी यांनी त्यांनी हाती घेतलेल्या सामाजिक उपक्रमांची माहिती दिली.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com

# लक्ष्मीपूजन



दिवाळीच्या दिवसांमधला सर्वात महत्त्वाचा सण म्हणजे लक्ष्मीपूजन! धन, समृद्धी आणि मंगलप्राप्तीसाठी प्रत्येकजण या दिवशी देवी लक्ष्मीची आराधना करतो.
चला तर जाणून घेऊया यंदाच्या लक्ष्मीपूजनाचा शुभ मुहूर्त आणि पूजा विधीची सर्व माहिती..

**लक्ष्मीपूजन तारीख, तिथी**

२० ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजून ४४ मिनिटांनी अमावास्या तिथी सुरू होणार असून, २१ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री संध्याकाळी ५ वाजून ५४ मिनिटांनी अमावास्या तिथी समाप्त होणार आहे. उदय तिथीनुसार, लक्ष्मीपूजन २१ ऑक्टोबरच्या संध्याकाळी केले जाईल.

**लक्ष्मीपूजन कसे करावे?**

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी लक्ष्मीची पूजा कशी करावी, याविषयी लोकसत्ताने पंडित उदय मोरोणे यांच्या हवाल्याने माहिती जाणून घेतली. ते सांगतात, "लक्ष्मी सरस्वती पूजनाचे तीन प्रकार निरनिराळे आहेत. भाद्रपद शुक्ल पक्षांत, अश्विन शुक्ल पक्षांत आणि कृष्ण अमावास्येस. या तीन प्रकारांपैकी पहिले दोन्ही प्रकार प्रत्येक घरीच होत असतात. परंतु तिसऱ्या प्रकारचे जे लक्ष्मीपूजन आहे ते फक्त "व्यापारे वसते लक्ष्मीः" या न्यायाने व्यापारी वर्गच आपल्या दुकानांतून, पेढींत, ऑफिसांत वैगरे सार्वजनिक उत्सवपद्धतीने करीत असतो."

**कोणत्या दिशेला पूजा मांडावी?**

दिवाळीच्या दिवशी पूजा करताना दिशेचे विशेष भान ठेवावे. असे मानले जाते की पूजा नेहमी उत्तर किंवा उत्तर-पूर्व दिशेलाच करावी. संपूर्ण कुटुंबासोबत दिवाळीची पूजा केल्याने घरात सकारात्मक ऊर्जा राहते आणि सर्व सदस्यांवर माता लक्ष्मीची कृपा राहते. तसेच, पूजा करताना या गोष्टीचीही काळजी घ्या की पूजा करणाऱ्या व्यक्तीचे तोंड उत्तर किंवा पूर्व दिशेला असावे.

**लक्ष्मी पूजनात या गोष्टी लक्षात ठेवा**

दिवाळीच्या दिवशी देवी लक्ष्मीची पूजा करताना उत्तर दिशेला दिवा लावणे शुभ मानले जाते. तसेच, देवीच्या पूजनात श्रीयंत्र, कौडी आणि गोमती चक्र अवश्य ठेवावे. त्यानंतर, प्रदोष काळात शुभ मुहूर्तावर विधी-विधानाने माता लक्ष्मीची पूजा व आरती करावी.

**घरी लक्ष्मीपूजन कसे करावे?**

सुरूवातीला चौरंग घ्यावा. चौरंगावर लाल कापड टाकावा. त्यावर तांदूळ टाकून एक कलश ठेवावा. त्या कलशावर एक प्लेट ठेवून त्या प्लेटवर लक्ष्मीची मूर्ती ठेवावी व त्या मूर्तीची पूजा करावी. तसेच लक्ष्मीचा फोटो ठेवावा व विडा ठेवावा. त्या विड्यावर नारळ ठेवावे. सुरूवातीला गणपतीची पूजा करावी नंतर लक्ष्मीची पूजा करावी. शेवटी मनोभावे आरती करावी.

# फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण : आनंदी क्षणातून निसर्गविनाश

भारतीय समाज हा सण-उत्सवप्रिय समाज म्हणून जगात ओळखला जातो. आपल्या संस्कृतीतील प्रत्येक सण हा आनंद, ऐक्य, परंपरा आणि श्रद्धेचे प्रतीक असतो. पण आधुनिक काळात या सणांच्या साजरीकरणात अनेक नव्या प्रथा समाविष्ट झाल्या आहेत, ज्यामुळे निसर्गाच्या आरोग्यावर आणि मानवी जीवनावर गंभीर परिणाम होत आहेत. त्यातीलच एक म्हणजे फटाक्यांचा अतिरेकी वापर, ज्यामुळे निर्माण होणारे ध्वनी आणि वायू प्रदूषण आज आपल्या समाजासाठी चिंतेचा विषय बनला आहे. दिवाळी, नाताळ, नवीन वर्ष, लग्नसोहळे, क्रिकेटमधील विजय किंवा राजकीय कार्यक्रम अशाप्रकारचा कोणताही प्रसंग असो, फटाक्यांच्या आवाजाशिवाय तो अपूर्ण वाटतो. परंतु या काही क्षणांच्या आनंदामागे दडलेले प्रदूषणाचे सत्य आपण वारंवार विसरतो.

फटाक्यांचे उत्पादन हे रासायनिक पदार्थांच्या जटिल मिश्रणावर आधारित असते. पोटॅशियम नायट्रेट, सल्फर, कोळशाची भुकटी, बॅरियम, मॅग्नेशियम, लीड, आर्सेनिक, ॲल्युमिनियम, स्ट्रॉन्शियम यांसारख्या अनेक धातू आणि रासायनिक घटकांचा वापर त्यात केला जातो. हे पदार्थ जळताना हवेमध्ये नायट्रोजन ऑक्साइड, सल्फर डायऑक्साइड, कार्बन डायऑक्साइड, कार्बन मोनोऑक्साइड आणि सूक्ष्म धूलिकण सोडतात. या प्रदूषक वायूंमुळे वातावरणातील हवा विषारी बनते. विशेषतः PM2.5 आणि PM10 या सूक्ष्मकणांचे प्रमाण फटाक्यांच्या दहनावेळी अनेक पट वाढते. (PM2.5 म्हणजे अतिशय बारीक, आणि PM10 म्हणजे थोडे मोठे कण) हे सूक्ष्मकण इतके लहान असतात की ते थेट फुफ्फुसांमध्ये जाऊन रक्तप्रवाहात मिसळतात, ज्यामुळे श्वसनाचे आजार, दमा, ब्रॉन्कायटिस, फुफ्फुसाचे संक्रमण आणि हृदयविकारांची जोखीम वाढते.प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार, भारतातील प्रमुख शहरांमध्ये दिवाळीनंतर हवेमधील प्रदूषणाची पातळी नेहमीपेक्षा चार ते पाच पट वाढते. दिल्ली, मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये दिवाळीच्या रात्रीनंतर PM2.5 च्या प्रमाणात अत्यंत झपाट्याने वाढ होते. दिल्लीमध्ये तर AQI (Air Quality Index) "गंभीर" या श्रेणीत म्हणजे ४००-५०० पर्यंत पोहोचतो. ही परिस्थिती श्वसनास त्रास देणारी आणि जीवघेणी ठरू शकते. हवेमध्ये सल्फर डायऑक्साइड व नायट्रोजन ऑक्साइडचे प्रमाण वाढल्यामुळे डोळ्यांत जळजळ, घसा खवखवणे, डोकेदुखी, थकवा आणि श्वास घेण्यास त्रास अशी लक्षणे सामान्यपणे दिसून येतात.फटाक्यांच्या दहनामुळे केवळ वायू प्रदूषणच नाही, तर ध्वनी प्रदूषणही प्रचंड प्रमाणात वाढते. साधारण मानवी कानाला सुरक्षित ध्वनीमर्यादा ७५ डेसिबेल इतकी असते, परंतु फटाक्यांच्या स्फोटावेळी आवाजाची तीव्रता १२० ते १५० डेसिबेलपर्यंत पोहोचते. अशा तीव्र आवाजामुळे कानातील श्रवणशक्तीवर परिणाम होतो, झोपेच्या गुणवत्तेत घट येते, रक्तदाब वाढतो आणि मानसिक ताण निर्माण होतो. वृद्ध व्यक्ती, लहान मुले आणि रुग्ण यांच्यासाठी हा आवाज विशेषतः त्रासदायक असतो. पक्षी, प्राणी यांनाही ध्वनी प्रदूषणाचा मोठा फटका बसतो. अनेक पक्षी दिशाभूल होऊन झाडांवरून पडतात, पाळीव प्राण्यांमध्ये भीती आणि अस्वस्थता निर्माण होते, तर वन्यजीवांमध्ये प्रजननाच्या प्रक्रियेवर परिणाम होतो.फटाक्यांचा परिणाम फक्त हवेमध्येच मर्यादित राहत नाही. त्यांचे अवशेष म्हणजे कागदाचे तुकडे, धातूंचे कण, प्लास्टिकचे कवच आणि राख जमिनीवर साचतात. हे सर्व नाल्यांत, पाण्याच्या स्रोतांत आणि शेतीच्या जमिनीत मिसळून जमिनीचे आणि जलस्रोतांचे प्रदूषण निर्माण करतात. जड धातूंचे हे अवशेष जमिनीतील पोषक घटकांची हानी करतात, त्यामुळे पीक उत्पादनावरही परिणाम होतो. नद्या आणि तलावांमध्ये मिसळलेले हे रसायन जलीय जीवसृष्टीसाठी घातक ठरते.फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण हा केवळ पर्यावरणाचा प्रश्न नाही, तर तो सामाजिक आणि आर्थिक प्रश्नही आहे. दरवर्षी फटाके फोडताना शेकडो अपघात होतात. मुलांच्या आणि तरुणांच्या हातांना, चेहऱ्यांना व डोळ्यांना गंभीर दुखापती होतात. अनेकांना आयुष्यभरासाठी अपंगत्व येते. या दुर्घटनांमुळे रुग्णालयांवरील भार वाढतो आणि कुटुंबांवर मानसिक तसेच आर्थिक ओझे येते. प्रदूषणामुळे वाढणाऱ्या आजारांमुळे आरोग्यखर्च वाढतो, कामकाजातील उत्पादकता कमी होते आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवरही त्याचा नकारात्मक परिणाम होतो. भारतामध्ये 'वायू प्रदूषण प्रतिबंधक कायदा, १९८१', 'पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६' आणि 'ध्वनी प्रदूषण नियंत्रण नियम, २०००' यांद्वारे फटाक्यांच्या वापरावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न केले गेले आहेत. सर्वोच्च न्यायालयानेही दिवाळीच्या काळात केवळ "ग्रीन फटाके" वापरण्याची शिफारस केली आहे. हे ग्रीन फटाके पारंपरिक फटाक्यांपेक्षा सुमारे ३० टक्के कमी प्रदूषण निर्माण करतात. तसेच रात्री १० नंतर फटाके फोडण्यास बंदी घालण्यात आली आहे. तथापि, या नियमांचे पालन नागरिकांनी मनापासून केले नाही, तर कायदे कागदावरच राहतील. यावर उपाय म्हणून जनजागृती आणि जबाबदार वर्तन अत्यंत आवश्यक आहे. सण साजरे करणे हे आपल्या संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे, पण सण साजरा करताना निसर्गाचा अपमान न करता, पर्यावरणपूरक पद्धती अवलंबणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. आपण सणाचा आनंद फटाक्यांशिवायही साजरा करू शकतो. पारंपरिक दिवे, एलईडी लाइट्स, संगीत, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम आणि पर्यावरण रक्षणाचे संकल्प यांद्वारे. शाळा-कॉलेजांतून विद्यार्थ्यांना फटाक्यांच्या दुष्परिणामांबद्दल शिक्षित केले पाहिजे. माध्यमांनीही याबाबत जबाबदार भूमिका घेत जनतेला जागरूक करणे आवश्यक आहे.आजचा काळ हा हवामान बदलाचा आणि पर्यावरणीय संकटांचा काळ आहे. पृथ्वीचे तापमान वाढत आहे, पर्जन्यमानात अनिश्चितता वाढली आहे, आणि शुद्ध हवा हे आता लक्झरीसारखे झाले आहे. अशा वेळी काही क्षणांचा आनंद मिळवण्यासाठी आपण आपल्या भविष्याच्या श्वासावर संकट आणू शकत नाही. प्रत्येक नागरिकाने प्रदूषणमुक्त सण साजरा करण्याचा संकल्प केल्यास ही समस्या निश्चितच कमी होईल. फटाक्यांचा आवाज काही क्षणासाठी आकाश उजळवतो, पण त्याच धुराने आपल्या जीवनाचा प्रकाश मंदावतो. निसर्गाचा आवाज ऐका तो आपल्याला सांगतो की "आनंद करा, पण जबाबदारीने." सण साजरा करा, पण प्रदूषण नको. प्रकाश पसरवा, पण निसर्गाच्या श्वासाच्या किंमतीवर नाही. खरी दिवाळी, खरा आनंद, खरा प्रकाश तोच जो निसर्ग, समाज आणि मानव यांच्या समन्वयातून जन्मतो. चला, या सणासुदीला आपण सर्वांनी मिळून ठरवूया की "फटाके नाही, फुलझड्यांऐवजी फुलांची सजावट, धूर नाही तर स्वच्छ हवा, आवाज नाही तर आनंदाचा गजर." कारण सणाचा खरा अर्थ आहे प्रकाशाचा उत्सव आणि तो प्रकाश पर्यावरणपूरक, स्वच्छ आणि शाश्वत असेल, तेव्हाच तो खऱ्या अर्थाने उज्ज्वल ठरेल.

- डॉ. राजेंद्र बगाटे, समाजशास्त्राचे अभ्यासक

# पोलिस हुतात्मा दिन

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

आज २१ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण देशात पोलीस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. अखंड देशासाठी त्यागाची भावना ठेवून कर्तव्यावर असलेले अनेक पोलीस जवान शहीद होतात त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस पाळण्यात येतो.

२१ ऑक्टोबर १९५९ रोजी पोलीस दलातील १० पोलीस शिपाई लडाख हद्दीत भारत - तिबेट सीमेवर व दोन हजार पाचशे हॉट ग्रीन या सीमेवर निर्जन बर्फाच्छादित प्रदेशात कडाक्याच्या थंडीत गस्त घालत असताना धोकादायक पद्धतीने दबा धरून बसलेल्या चिनी सैनिकांच्या हल्ल्यात शहीद झाले. या दिवसाची आठवण रहावी तसेच देशामध्ये दहशतवादी हल्ल्यात, नक्षलवादी कारवाईत, समाज कंटक व हिंसक कृत्य करणाऱ्यांकडून कर्तव्यावर असताना शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतीला या दिवशी उजाळा दिला जातो.



२४ तास ऑन ड्युटी असे पोलिसांचे वर्णन केले जाते. कारण जनतेच्या सेवेसाठी ते २४ तास तयार असतात गणेशोत्सव असो की नवरात्र, दसरा असो की दिवाळी, ईद असो की नाताळ देशातील जनतेला सुरक्षित ठेवण्यासाठी ते कायम तत्पर असतात. जेंव्हा आपण आपल्या कुटुंबासोबत हे सण साजरे करत असतो, तेंव्हा ते आपल्या सुरक्षेसाठी कुटुंबापासून दूर असतात. त्यांच्यामुळेच आपण सर्व सण, उत्सव आनंदाने साजरे करू शकतो. मोर्चे, आंदोलने, निवडणुका पोलिसांशिवाय पार पडूच शकत नाही. मोर्चे, आंदोलने, निवडणुकीसाठी कायम पोलीस बंदोबस्त तैनात असतो. कोणतीही आपत्ती येऊ मग ती निसर्ग निर्मित असो की मानव निर्मित जनतेच्या रक्षणासाठी सर्वात प्रथम पोलिसच हजर असतात. पोलिस जनतेच्या सुरक्षेसाठी काय करू शकतात हे मुंबईवर झालेल्या २६ / ११ च्या पाक पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यात जगाने पाहिले आहे. केवळ पोलिसांच्या धाडसामुळे मुंबईवर हल्ला करण्याचा दहशतवाद्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला. प्राणाची बाजी लावून पोलिसांनी मुंबई वाचवली. या हल्ल्यात अनेक पोलीस शहीद झाले. स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन पोलिसांनी मुंबईकरांचा जीव वाचवला.

१९९२ साली मुंबईत झालेल्या जातीय दंगलीतही पोलिसांचे कार्य अतुलनीय असेच होते. कोरोना सारख्या महामारीत तर पोलिसांचे महत्व आणखी अधोरेखित झाले. देशवासियांना कोरोनाच्या महामारीपासून वाचवण्यासाठी पोलिसांनी जे कार्य केले त्याला तोड नाही. कोरोनाने हजारो पोलिसांचा बळी घेतला तरीही पोलीस आपल्या कर्तव्यापासून तसूभरही हलले नाहीत. पंतप्रधानांनी त्यांना त्यांच्या या कार्यासाठी कोव्हिड योद्धा ही उपाधी दिली होती. पंतप्रधानांनी पोलिसांना दिलेली कोव्हीड योद्धा ही उपाधी सर्वार्थाने योग्य होती. देशातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आपल्या कुटुंबाची पर्वा न करता बारा ते अठरा तास प्रसंगी सुट्टी न घेता कर्तव्यावर राहून मातृभूमीचे रक्षण करण्यासाठी अनेक पोलीस जवान शहीद होतात.

दहशतवादी, नक्षलवादी यासारख्या देशविघातक शक्तींविरुद्ध लढताना काहींना वीरमरण येते. अशा शहीद जवानांचे स्मरण करून त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करणे हे देशातील प्रत्येक नागरिकांचे कर्तव्यच आहे. या दिवशी सरकारच्या वतीने पोलीस हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून शहीद पोलीस जवानांना मानवंदना दिली जाते. हा दिवस देशातील सर्व पोलीस जवान, अधिकारी, कर्मचारी यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा व पवित्र आहे. पोलिस हुतात्मा दिनानिमित्त शहीद पोलीस जवानांना विनम्र अभिवादन!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com



# अयध्येतील पहिली 'श्रीराम' दिवाळी

दिवाळीच्या उत्सवाजवळ येत असताना, त्याच्या गाभाऱ्यात असलेल्या गहन कथेवर आपण चिंतन करूया. १४ वर्षांच्या वनवासानंतर श्रीरामांचे अयोध्येत पुनरागमन हे केवळ एक ऐतिहासिक वृत्तांत नाही तर लाखो लोकांना प्रेरणा देणारे एक कालातीत कथा आहे. हिंदू संस्कृतीच्या रचनेत खोलवर विणलेली ही प्राचीन कथा, आशा, धार्मिकता आणि वाईटावर चांगल्याचा विजय या गोष्टी आपण कसा समजून घेतो यावर प्रभाव पाडते. श्रीरामांचे वनवास, सीतेचे अपहरण, महान युद्ध आणि शेवटी, तेलाचे दिवे लावण्याची परंपरा सुरू करणारे स्वदेशप्रवास. कार्तिक महिन्याच्या पवित्र महिन्यात घडलेली ही कथा केवळ एका सणाबद्दल नाही; तर एका घटनेने संपूर्ण संस्कृतीसाठी आशा आणि आनंदाचे प्रतीक कसे बनले याबद्दल आहे. चला या मनमोहक कथेत जाऊया आणि आजही अयोध्येत दिवाळीला इतके महत्त्व का आहे ते शोधूया.

१४ वर्षांच्या वनवासानंतर श्रीरामांचे अयोध्येत पुनरागमन हा एक महत्त्वाचा प्रसंग होता जो शतकानुशतके दिवाळी म्हणून साजरा केला जातो. श्रीरामांनी रावणावर विजय मिळवल्याची बातमी पसरताच, अयोध्येतील नागरिकांनी मोठ्या उत्साहाने त्याच्या परतीची तयारी सुरू केली. त्यांच्या लाडक्या राजपुत्राच्या स्वागताच्या आशेने संपूर्ण शहर सजवले गेले होते. लोकांनी आपली घरे स्वच्छ केली, रस्ते सजवले आणि भव्य तयारीची चर्चा करण्यासाठी एकत्र आले.

अयोध्येतील पहिली दिवाळी पाहण्यासारखी होती. श्रीराम, सीता माता आणि लक्ष्मण शहराजवळ येताच, लोकांनी त्यांचा मार्ग उजळवण्यासाठी हजारो मातीचे दिवे (दिवे) लावले. शहर एका उबदार, सोनेरी प्रकाशात न्हाऊन निघाले, जे अज्ञानाच्या अंधाराला दूर करणाऱ्या ज्ञानाच्या प्रकाशाचे प्रतीक आहे. दिवाळीत तेलाचे दिवे लावण्याची ही परंपरा आजही चालू आहे.

# पर्यावरण पूरक दिवाळी साजरी करा, दिवाळी -प्रकाश आणि आनंदाचा सण

दिवाळी म्हणजे प्रकाशाचा ,आनंदाचा, नवसृजनाचा आणि एकोपा वाढविण्याचा सण आहे. मात्र पूर्वीचा सण याची जागा प्रदूषण,आवाज, धूर, आणि कचरा वाढविण्याचा सण बनला आहे.म्हणून या सणाकडे पाहताना तो पर्यावरण पूरक कसा होईल याचा प्रत्येकाने विचार करण्याची गरज आहे.

पर्यावरणपूरक दिवाळी याचा साधा सरळ अर्थ निसर्गाला कोणतीही हानी न पोहचविता साजरा केलेला सण होय. प्लास्टिकचे वापर,फटक्यात रासायनिक रंग, याचा वापर टाळला पाहिजे.नैसर्गिक स्थानिक आणि पुनर्वापर करता येईल अशा वस्तू वापरात आणल्या पाहिजे, आत्ताच्या युगात फटाके,रोषणाई हा प्रतिष्ठेचां विषय बनत चालला आहे लोकप्रतिनिधींच्या आगमनात,तासनतास फटाक्यांचा आवाज असतो तो टाळला पाहिजे.यातून निर्माण होणारा धूर, ध्वनी हानिकारक असतो.तो अबाल वृद्ध,पशु, पक्षी यांना पण हानिकारक आहेच तो टाळला पाहिजे.

मातीच्या दिव्यांचा वापर,केला पाहिजे इलेक्ट्रॉनिक दिव्यांना वापर टाळता आला पाहिजे, कारण मातीचे दिवे बनविणाऱ्या कारागिरांना रोजगार मिळेल,पर्यायाने त्यांची दिवाळी आनंदाने साजरी होईल. सजावटीसाठी नैसर्गिक साहित्य जसे पाने,फुले,कागद,जुने कपडे, वापरून आकर्षक सजावट करता येईल,प्लास्टिक तोरणा ऐवजी पाने फुले यांचे तोरण वापरता येते.रांगोळी साठी तांदळाचे पीठ,,नैसर्गिक रंग,फुलांच्या पाकळया,याचा वापर केला पाहिजे.घराची स्वच्छता करताना प्लास्टिक वस्तू , वापरता न येणाऱ्या वस्तू दान करा, फेकून देऊ नका. स्थानिक कारागीर,शेतकरी लघुउद्योजक यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी त्यांच्याकडून वस्तू खरेदी करा.भेटवस्तू देण्यासाठी फुलझाडे कुंड्या भेट द्या. पर्यावरण पूरक अशा वस्तू भेट द्या. कापडी पिशव्यांचा वापर करा,इतरांना आग्रह करा. हाताने बनविलेल्या वस्तू भेट द्या.

आपण असे केल्याने प्रदूषण कमी होईल,ऊर्जेची बचत होईल पर्यायाने सामाजिक जबाबदारीची भावना वृद्धिंगत होईल.पूर्वी मातीचे दिवे,तूप यातून एक वेगळाच आनंदी वातावरण असायचं ते आता दिसत नाही. प्रत्येकाने आपल्यात थोडा बदल करून पर्यावरण जपले पाहिजे. थोडक्यात दिवाळीचा खरा अर्थ अंधारावर प्रकाशाचा विजय आज अंधार म्हणजे प्रदूषण भौतिक लोभ निसर्गाची हानी होत आहे.ती टाळली पाहिजे.म्हणूनच पर्यावरण पूरक दिवाळी साजरी करा ही काळाची गरज आहे.

**सी.आर.म्हात्रे**
सामाजिक कार्यकर्ते
पेण वाशी खारेपाट











## पेण मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेसला दोन जिप व तीन पंचायत समिती जागा मिळण्याची आग्रही मागणी

**दै . ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : पेण तालुक्यात होऊ घातलेल्या आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांनी दोन जिल्हा परिषद मतदार संघ आणि तीन पंचायत समिती गण मध्ये निवडणूक लढवण्यास आग्रही असल्याची मागणी पत्रकार परिषदेत सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे पेण विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष नरेंद्र ठाकूर तसेच पेण तालुका अध्यक्ष दयानंद भगत यांनी घेतलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेमध्ये ही मागणी केली आहे. पेण तालुक्यातील पाच जिल्हा परिषद मतदार संघ आणि दहा पंचायत समिती गणामध्ये आगामी निवडणूक होत असल्यामुळे आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषदेच्या आणि पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट दोन जिल्हा परिषद आणि तीन पंचायत समिती गणामध्ये निवडणूक लढवणार अशी मागणी करण्यात आली आहे.रायगडचे खासदार सुनील तटकरे माजी आमदार अनिकेत तटकरे व राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती ताई तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी निवडणूक लढवणार असून जो निर्णय अनिकेत भाई तटकरे घेतील त्या निर्णयाशी आम्ही ठाम राहणार असेही नरेंद्र ठाकूर आणि दयानंद भगत यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

वाचक मनोगत

## बाटलीबंद पाणी खरोखरच शुद्ध असते का?

बंद बाटल्या व जार मधून पाणी विकण्याचा धंदा सध्या जोरात चाललाय. लग्नसराईमुळे व उन्हाळ्यामुळे या पाण्याला पुष्कळ मागणी आहे हे पाणी बाटलीबंद असल्याने ते शुद्ध असल्याच्या भ्रमात राहून ग्राहक डोळे मिटून ते पितात.रेल्वेस्थानक,एस. टी.स्थानक,टपऱ्या,कोल्ड्रिंक व किराणाचे दुकाने येथे पाण्याची छोटी पाकिटे मिळतात ती स्वस्त असल्याने प्रचंड खपतात,हे पाणी कोठूनआणले जाते त्याच्या शुद्धतेची खात्री काय हे कोणालाच माहीत नसते आरोग्य विभागाचे या ढळढळीत प्रकाराकडे दुर्लक्ष असते निदान ग्राहकांनी तरी जागृत व्हावे.महत्वाचेअसे की छोटे,छोटे समारंभ असो की हळदी,लग्न इत्यादी ठिकाणी 200 एम एल च्या बाटल्यांची व्यवस्था केलेली असते त्यावेळी त्या रिकाम्या बाटल्यांचा पाऊस आजूबाजूला पडलेला असतो, हा 200 एम एल ची पाण्याची बाटली उपलब्ध करणे हा प्रेस्टिज इश्यू (इगो)असतो,यायोगे प्लास्टिकचा भस्मासूर निर्माण होण्यासाठी आपणच कारणीभूत ठरतो,पण कमीत कमी त्यांनी जर पाण्याच्या टाक्या सोबत ग्लासची व्यवस्था केली तर या प्लॅस्टिकच्या बाटल्यांचा पाऊस तरी निर्माण होणार नाही,पहा विचार करा.

**- सुनिल इंगळे,खडकपाडा,कल्याण.**

## भिवंडीतील काल्हेर गावात शिवसेनेने केला दिवाळी निमित्त लाडकी बहिण सन्मान



**दै . ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : लाडकी बहीण ही योजना राज्य शासनाने गरजू महिलांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी निर्माण केली आहे.या योजनेतून महिलांची अर्थिक स्थिती सुधारणे आणि त्यांचा सर्वागीण विकास करणे हा योजणेचा मुख्य उद्देश आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व शिवसेनेचे पक्ष प्रमुख राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही योजना यशस्वी होण्यासाठी विशेष प्रयत्न केल्याने आज महिला समाधान व्यक्त करीत आहेत.त्यांमुळे महिलावर्ग भक्कमपणे महायुती शासनाच्या मागे उभी आहे. येणाऱ्या पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत शिवसेना भरघोस यश मिळेल अशी अपेक्षा शिवसेनेचे ठाणे जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांनी भिवंडीत आयोजित दिवाळी निमित्त आयोजित लाडकी बहिण सन्मान महिला मेळावा कार्यक्रमात व्यक्त केले आहे.

आगामी होणाऱ्या पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या निवडणूक डोळ्यासमोर ठेवून ठाणे ग्रामीण भागात शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षबांधणी व जनसंपर्क मोहीम ठाणे जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांच्या नेतृत्वाखाली सुरू झाली असुन भिवंडी तालुक्यातील काल्हेर जिल्हापरिषद गटात दिवाळी निमित्त भाऊबीज निमित्त " लाडकी बहिण सन्मान " महिला मेळावा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.यावेळी उपस्थित महिलांना साडी व फराळ वाटप करण्यात आला.प्रसंगी काल्हेर ग्रामपंचायत सरपंच अरुीषा पंकज तरे, उपसरपंच भरत पाटील, कशेळी ग्रामपंचायत सरपंच वैशाली थळे,जेष्ठ शिवसैनिक नितीन शाह,माजी सरपंच पलजूबाई थळे,शिवसेना तालुका प्रमुख इद्रपाल तरे,उपतालुका प्रमुख दिपक म्हात्रे, विभाग प्रमुख वितेश पाटील,योगेश माळी,युवासेनेचे अदित्य थळे, उमाकांत पाटील, शशिकांत पाटील यांच्यासह मान्यवर ग्रामपंचायत सदस्य,शिवसैनिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या,महायुतीचा माध्यमातून महाराष्ट्र राबविण्यात येत असलेली लाडकी बहिण योजना यशस्वी ठरली असुन अनेक महिलांना या योजनेचा फायदा झाला.त्यामुळे महिला शिवसेनेच्या सोबत असुन आगामी निवडणुकीत शिवसेना महायुतीला यश मिळेल असे मत शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांनी व्यक्त केले.महिलांचे सबलीकरण व उन्नती व्हावी यासाठी शासन माध्यमातून शिवसेना नेहमी पुढाकार घेईल असे आश्वासन देवानंद थळे यांनी यावेळीव्यक्त करून महिलांना देत दिवाळी भाऊबीज निमित्त साडी देत करून शुभेच्छा व्यक्त केल्या,यावेळी एक हजारांहून अधिक महिला या कार्यक्रमात सहभागी झाले होत्या.

## बेलकर आदिवासी पाड्यावर कातकरी कुटुंबासोबत दिवाळी साजरी




**दै . ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : आशा लीला फाउंडेशन कल्याण तर्फे कल्याण तालुक्यातील बेलकरपाडा बापसई येथील कातकरी समाजासोबत दिवाळी साजरी करण्यात आली.कातकरी पाडा शोधण्यासाठी युवा संस्कार संस्था दहिवली यांनी मदत केली. पाड्यावरल्या 30 कुटुंबांना नवीन साडी, पुरुषांना शर्ट पीस पॅन्ट पीस, टॉवेल टोपी, दिवाळीचा फराळ तसेच थंडीसाठी ब्लँकेट्स लहान मुलांचे कपडे आणि लहान मुलांसाठी खाऊ म्हणून चॉकलेट बिस्किट याचे वाटप करण्यात आले.

त्याचबरोबर आदिवासी बंधू-भगिनींशी संवाद साधून त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

या कार्यक्रमासाठी प्रदीप पानसरे, गणेश पानसरे, उमाकांत चौधरी, प्रमोद दहाट, विरेश सक्सेना, प्रशांत हेडाऊ, विनय हेडाऊ, सोमनाथ राऊत, तसेच महिला कार्यकर्त्या सीमा सक्सेना, मंगला आरोटे, प्रतिभा चासकर, कामाक्षी हेडाऊ, स्वरा राठोड यांनी विशेष मेहनत घेतली आणि कार्यक्रम यशस्वी करण्यास मदत केली.

## विद्यार्थ्यांना दिवाळी फराळ आणि फटाक्याचे वाटप !

**दै . ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण** : वासिंद जवळील जिल्हा परिषद शाळा, सारमाळ (शिंगे पाडा) मधील विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या वतीने दिवाळी फराळ आणि फटाक्याचे वाटप करण्यात आले.

जिल्हा परिषद शाळेतील या मुलांबरोबर गोड दिवाळी साजरी व्हावी यासाठी शाळेचे शाळेचे मुख्याध्यापक अनिल पडवळ व सहशिक्षिका नीलम भोईर यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दिवाळी



फराळाचे व फटाके वाटप करुन विद्यार्थ्यांची दिवाळी गोड केली तर या शाळेतील सहशिक्षिका नीलम भोईर मॅडम यांनी स्वतः चिकनची भाजी बनवून विद्यार्थी व पालकांना खाऊ घालून हा उपक्रम साजरा केला

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा किरण मेंगाळ, माजी अध्यक्षा नीलम वाघ, मुख्याध्यापक अनिल पडवळ, सहशिक्षिका नीलम भोईर व ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फटाकेमुक्त दिवाळी

**दिवाळी हा भारतीय संस्कृतीतील सर्वात मोठा, प्रसिद्ध आणि आनंददायी सण मानला जातो. अंधारावर प्रकाशाचा विजय, अज्ञानावर ज्ञानाचा विजय आणि दुःखावर आनंदाचा विजय हे या सणामागील मूलभूत तत्त्व आहे. दिवाळीत घरांची स्वच्छता केली जाते, दिवे लावले जातात, रांगोळ्या काढल्या जातात, पारंपरिक कपडे परिधान केले जातात, गोडधोड पदार्थ खाल्ले जातात आणि लक्ष्मी पूजन केले जाते.**

प्रदूषण आणि आरोग्यावर होणारे परिणाम

फटाके फोडल्यामुळे प्रचंड प्रमाणात धूर, कार्बन डायऑक्साईड, सल्फर डायऑक्साईड आणि इतर विषारी वायू हवेत मिसळतात. त्यामुळे हवा दूषित होते. ही दूषित हवा श्वासावाटे शरीरात गेल्यास फुप्फुसांचे आजार, दमा, ॲलर्जी यासारख्या समस्या निर्माण होतात. लहान मुलं, ज्येष्ठ नागरिक, व दम्याचे रुग्ण यांना याचा मोठ्या प्रमाणात त्रास होतो. फटाके आपल्या आरोग्यावर थेट वाईट परिणाम करत असतात, त्यामुळे सर्वांनी फटाके मुक्त दिवाळी साजरी करणे गरजेचे आहे.

**■ प्राणी-पक्ष्यांचे हाल**

काही वर्षांपूर्वी ज्यांच्या चिवचिवाटणे प्रत्येकाची सकाळ आनंदी व गोडं व्हायची, ते अनेक पक्षी हल्ली दृष्टीस सुद्धा पडत नाहीत. कुत्रे मांजरे, गुरे-ढोरे, निसर्गातील पक्षी हे पशु-प्राणी फटाक्यांचा मोठा आवाज आणि प्रकाश यामुळे घाबरतात. अनेकदा ते घराबाहेर पळतात, त्यांना अपघात होतात, किंवा ते काही काळ खाता-पिताही नाहीत. पक्ष्यांची आवाजाच्या दाबामुळे श्रवणशक्ती कमी होण्याचेही प्रमाण वाढते. माणसांसोबतच इतर जीवसृष्टीची काळजी घेणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे, कारण आपल्या प्रमाणेच त्यांना सुद्धा जगण्याचा अधिकार आहे.

**प्राणी-पक्ष्यांचे हाल**

काही वर्षांपूर्वी ज्यांच्या चिवचिवाटणे प्रत्येकाची सकाळ आनंदी व गोडं व्हायची. ते अनेक पक्षी हल्ली दृष्टीस सुद्धा पडत नाहीत. कुत्रे मांजरे, गुरे-ढोरे, निसर्गातील पक्षी हे पशु-प्राणी फटाक्यांचा मोठा आवाज आणि प्रकाश यामुळे घाबरतात. अनेकदा ते घराबाहेर पळतात, त्यांना अपघात होतात, किंवा ते काही काळ खाता-पिताही नाहीत. पक्ष्यांची आवाजाच्या दाबामुळे श्रवणशक्ती कमी होण्याचेही प्रमाण वाढते. माणसांसोबतच इतर जीवसृष्टीची काळजी घेणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे, कारण आपल्या प्रमाणेच त्यांना सुद्धा जगण्याचा अधिकार आहे.

**पर्यावरणाचे नुकसान**

फटाके फोडल्यामुळे फक्त वायूच नव्हे तर ध्वनी प्रदूषणही मोठ्या प्रमाणावर होते. फटाक्यांचा मोठा आवाज १०० डेसिबलपेक्षा अधिक असतो, जो कानांसाठी घातक आहे. यामुळे वातावरणातील शांतता भंगते आणि सजीव सृष्टीला मोठ्या प्रमाणात धोका निर्माण होतो. शिवाय फटाक्यांमध्ये वापरले जाणारे प्लास्टिक व रसायनं यामुळे जमिनीदेखील प्रदूषित होते.

**■ अपघातांची शक्यता वाढते**

प्रत्येक दिवाळीत देशभरात अनेक लहान-मोठे अपघात फटाक्यांमुळे होतं असतात. काही जणांचे हात भाजतात, तर काहींच्या डोळ्यांना इजा होते, काहींचे कपडे पेटतात आणि काही वेळा आग लागून जीवितहानीही होते. लहान मुलं अनेक वेळा फटाके चुकीच्या पद्धतीने फोडतात आणि त्यांना गंभीर दुखापत होते. त्यामुळे फटाके केवळ खेळण्याची गोष्ट नाही, तर ते बऱ्याचवेळा नुकसान दायक सुद्धा ठरतात हे प्रत्येकाने लक्षात घेणे गरजेचे आहे.










Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN, Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West).
Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN. Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com

# पर्यावरण ठरवणार शहरांचे भविष्य !

**भारताची शहरे वेगाने बदलत आहेत, वाढत्या लोकसंख्येसोबत गुंतागुंतीच्या अडचणी आणि महत्त्वाकांक्षा हातात हात घालून पुढे येत आहेत. 2030 पर्यंत देशातील सुमारे 600 दशलक्ष लोक, म्हणजेच 40% लोकसंख्या, शहरांमध्ये वास्तव्यास असणार आहे. भारताच्या शहरीकरणाचा वेग प्रचंड असून हीच शहरे देशातील 70% हून अधिक हरितगृह वायू उत्सर्जनासाठी जबाबदार आहेत. मात्र, या वेगवान वाढीच्या शर्यतीत भारतातील शहरी धोरणकर्ते अंधारात वाटचाल करत आहेत. लवचिकता, समावेशकता आणि शाश्वतता साधण्यासाठी आवश्यक माहिती त्यांच्याकडे नाही. धोके कुठे अधिक आहेत, संधी कुठे आहेत, आणि निर्णय न घेण्याची किंमत काय असेल, या मूलभूत बाबीही स्पष्ट नाहीत. भारताच्या शहरी वाढीत एक मोठा विरोधाभास आहे. कारण डेटा जुना, अपुरा आणि तुटक आहे. पण याचवेळी, शहरांचं भविष्य वेगाने जवळ येत आहे, त्याचा थेट परिणाम सामान्य नागरिकाच्या दैनंदिन जीवनावर होत आहे.**

प्रजा फाउंडेशनच्या अहवालानुसार, मुंबईमधील झोपडपट्टीतील रहिवाशांना दररोज केवळ 45 लिटर प्रती व्यक्ति पाणी मिळते, जे शिफारस केलेल्या 135 लिटर प्रती व्यक्ति प्रती दिन (LPCD) मानकाच्या तुलनेत फारच कमी आहे. तसेच, नोएडा आणि गाझियाबादसारख्या घनदाट लोकवस्तीच्या शहरांमध्ये स्थानिक हवामान निरीक्षण केंद्रांचा अभाव असल्यामुळे हवामानाचा इशारा उशिरा मिळतो किंवा अचूकपणे मिळत नाही. यामुळे अतिवृष्टी, उष्णतेच्या लाटा यांसारख्या टोकाच्या हवामान घटनांचा धोका अधिक वाढतो. माहिती संकलन आणि वापराच्या प्रणालीमध्ये गंभीर सुधारणा न झाल्यास, भारतातील शहरे अव्यवस्थीत, अधिक असुरक्षित आणि अशाश्वत होण्याच्या मार्गावर आहेत. शहरी योजनांच्या केंद्रस्थानी अद्ययावत, स्थानिक पातळीवरील आणि कृतीक्षम माहिती नसल्यास, ही शहरे वाढत्या समस्यांसमोर टिकू शकणार नाहीत.

ही समस्या केवळ आकड्यांच्या अभावापुरती मर्यादित नाही. भारतातील बहुतांश शहरे आजही 'डेटा डेझर्ट्स',(data deserts) म्हणजेच माहितीविरहित क्षेत्रांमध्ये मोडतात. गृहनिर्माण, वाहतूक, प्रदूषण नियंत्रण आणि सार्वजनिक आरोग्यासारख्या मूलभूत बाबतीत निर्णय घेण्यासाठी अनेक शहरांना आजही 2011 च्या जनगणनेवर अवलंबून राहावं लागतं. ही माहिती एक दशक जुनी असून, दरम्यान कोट्यवधी लोकांनी स्थलांतर केलं आहे, नवी महानगरे उदयास आली आहेत, आणि हवामान संकट अधिकच गडद झालं आहे. काही भाग नव्यानं विकसित झाले, तर काही इतके घनदाट झाले की त्यांची मूळ ओळखच पुसट झाली आहे. तरीही नियोजनकर्ते अनिश्चिततेच्या अधारावर काम करत आहेत. एखाद्या क्षेत्रात किती लोक राहतात, त्यांची गरज काय आहे, आणि ते कोणत्या धोक्यांना सामोरं जात आहेत, याबद्दल अचूक माहिती उपलब्धच नाही.

नीती आयोगाचा SDG अर्बन इंडेक्स ही एक सकारात्मक पायरी असली, तरी तो फारच मर्यादित निकषांवर आधारित आहे. हवामान लवचिकता, सामाजिक समावेश आणि पर्यावरणीय गुणवत्ता यांसारख्या गंभीर मुद्द्यांकडे यामध्ये दुर्लक्ष होतं. जनाग्रह सेंटर फॉर सिटिझनशिप अँड डेमॉक्रसी (2023) च्या मूल्यमापनानुसार, भारतातील बहुतांश शहरांमध्ये दीर्घकालीन हवामान-संवेदनशील नियोजनाची मोठी पोकळी आहे. त्यामुळे शहरे भविष्यातील धोक्यांसाठी सज्ज न होता, अपूर्ण आणि अस्पष्ट माहितीच्या आधारेच पुढे जात राहतात. परिणामी, धोरणं प्रभावी ठरण्याऐवजी अधिकच अकार्यक्षम ठरतात.

ही केवळ शास्त्रीय किंवा धोरणात्मक पातळीवरची मर्यादा नाही, जर शहरांना त्यांच्या नैसर्गिक संसाधनांची स्थिती, हवामानाशी संबंधित धोके, आणि पर्यावरणीय कमकुवती यांची अचूक माहितीच नसेल, तर पूर, उष्णतेच्या लाटा, वादळं यांसारख्या संकटांशी प्रभावी लढा देणं अशक्य होऊन बसतं. आणि हे संकट केवळ भविष्यातील नाही, तर आजच भारतातील अनेक शहरी केंद्रांवर आदळू लागलेलं आहे. अशा स्थितीत कोणत्या भागात पूर येण्याचा धोका सर्वाधिक आहे, कुठे हवामानाची गुणवत्ता खालावत आहे, हिरवाई कोणत्या गतीने नष्ट होते आहे, याची कल्पनाही करता येत नाही. परिणामी, धोरणनिर्मिती अंधारात

पान 10 वर ▶▶▶









दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com

पान 09 वरून ▶▶▶

टाकलेल्या अंदाजांवर आधारित असते. त्याचा थेट फटका मात्र सामान्य नागरिकांनाच सहन करावा लागतो. शहरनिहाय, विभागनिहाय सुस्पष्ट डेटा उपलब्ध नसेल, तर शहरी नियोजन हे एक प्रकारचं 'अंदाजावर आधारित खेळ' ठरतं. जे अचूकतेपेक्षा चुकांवर अधिक आधारित असतं. आणि या गुंतागुंतीवर उपाय म्हणजे केवळ अधिक आकडे गोळा करणं नव्हे, तर "स्मार्ट मोजमाप" म्हणजेच योग्य प्रश्न विचारून, योग्य ठिकाणी, योग्य पद्धतीनं माहिती संकलन करणं अत्यावश्यक आहे. याच संदर्भात नॅचरल कॅपिटल अकाउंटिंग आणि इनक्लुझिव्ह वेल्थ फ्रेमवर्क ह्या दोन महत्त्वाची चौकट भविष्यातील दिशा दाखवतात. ह्या चौकटी केवळ GDP वाढवणे किंवा पायाभूत सुविधांची मोजणी एवढ्यापुरती मर्यादित राहत नाहीत. त्या अधिक खोल प्रश्न विचारतात की खरंच एक शहर संपन्न, राहण्यायोग्य आणि शाश्वत बनवणारे घटक कोणते? या चौकटी रस्ते आणि इमारतींपुरत्या थांबत नाहीत. त्या शहरातील संपूर्ण जीवनव्यवस्थेचा विचार करतात. जसे की, स्वच्छ हवा, हिरवळ, तलाव, दलदलीचे क्षेत्र यांसह झाडांचे आच्छादन, शिक्षण, आरोग्यसेवा. संयुक्त राष्ट्र पर्यावरण

# पर्यावरण ठरवणार शहरांचे भविष्य !

कार्यक्रमाच्या 2021 अहवालानुसार, भारताने या दिशेने पावले टाकायला सुरुवात केली आहे. भारताने System of Environmental-Economic Accounting (SEEA) या जागतिक मानकावर आधारित नॅचरल कॅपिटल अकाउंटिंगसाठी राष्ट्रीय सांख्यिकीय चौकट स्वीकारली आहे. ही चौकट धोरणकर्त्यांना निसर्गातील सेवा आणि संसाधनांना प्रत्यक्ष आर्थिक मूल्य देण्याची क्षमता देते. उदाहरणार्थ, शहरातील वनांमध्ये साठवलेले कार्बन, दलदलीने दिलेले पूरसंरक्षण, नद्यांच्या माध्यमातून भूजल पुनर्भरण हे फायदे पारंपरिक आकडेवारीत दिसत नाहीत, पण आता ते मोजता येतात. म्हणूनच, हा नवा दृष्टिकोन केवळ आकड्यांमधील बदल नव्हे, तर शहराच्या मूलभूत समृद्धीच्या संकल्पनाच बदलण्याचा प्रयत्न आहे. कल्पना करा, एक असा भविष्यकालीन भारत जिथे प्रत्येक प्रमुख शहरात 'इन्क्लुझिव्ह वेल्थ डॅशबोर्ड' नियमित अद्ययावत होऊन सर्वसामान्य नागरिकांसाठी खुले असेल. या डॅशबोर्डवर फक्त किती किलोमीटर रस्ते बांधले गेले याचीच माहिती न राहता, हवेची गुणवत्ता सुधारली आहे का, झाडांची संख्या वाढली आहे का, मुलांना अधिक शैक्षणिक संधी मिळत आहेत का, यांसारखी विविध मापनंही स्पष्ट दिसतील. अशा पारदर्शक व्यवस्थेमुळे शहर प्रशासन जनतेसमोर अधिक जबाबदार होईल आणि नागरिकांना चांगल्या सेवा मिळवण्यासाठी आवाज उठवण्याची ताकद मिळेल. परिणामी, स्थानिक सरकार दीर्घकालीन समृद्धीसाठी महत्त्वाच्या गुंतवणुकींना प्राधान्य देऊ शकतील, जसे की सार्वजनिक वाहतूक, हरित पायाभूत सुविधा, नवीकरणीय ऊर्जा, परवडणारी घरे, आणि सर्वसमावेशक सार्वजनिक जागा.

नैसर्गिक आणि मानवी भांडवल यांचे मूल्यांकन पारंपरिक आर्थिक मालमत्तांबरोबर केल्यास, शहरे अधिक दूरदृष्टीने निर्णय घेऊ शकतील, जे लोकांचे आरोग्य जपतील, पर्यावरण टिकवतील आणि खऱ्या अर्थाने शाश्वत विकास साधतील. शेवटी, ही फक्त माहिती किंवा डेटा याबाबतच नव्हे तर आपण समाज म्हणून काय महत्त्व देतो, याबाबतची गोष्ट आहे. भारताची शहरे एका टोकाला उभी आहेत आणि त्यांना दोन मार्गांपैकी एक निवडायचा आहे. पहिला मार्ग झपाट्याने आर्थिक लाभ देतो, पण त्यात असा धोका दडलेला आहे की तो नैसर्गिक प्रणालींना आणि शहरी जीवनाला आधार देणाऱ्या सामाजिक जाळ्यांना हानी पोहोचवू शकतो. दुसरा मार्ग अधिक खोलवर आणि संतुलित दृष्टीकोन मागतो, ज्यात विकासाचे निर्णय फक्त पायाभूत सुविधा आणि उत्पन्नावर नव्हे, तर हिरवळ, स्वच्छ हवा, सार्वजनिक आरोग्य आणि दीर्घकालीन कल्याण यांवरही आधारित असतात. ही संधी आहे अशी शहरे घडवायची, जी आज फुलतात, वाढतात आणि प्रगती करतात, पण त्याचवेळी भविष्यातील गरजा आणि पर्यावरणाचा कधीही त्याग करत नाहीत.

# डोंबिवलीत देवीच्यापाड्यावर ऐन दिवाळीत पाणी टंचाई

दै . ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** - गेल्या वर्षभरात कधीही पाण्याची टंचाई निर्माण झाली नाही. आता मुबलक पाऊस पडून, धरणांमध्ये पुरेसा पाणी साठा असुनही डोंबिवली पश्चिमेत देवीचापाडा गोपीनाथ चौक भागात गेल्या पंधरा ते वीस दिवसांपासून कमी दाबाने पाणी येण्यास सुरूवात झाल्याने रहिवासी तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत.

पालिकेकडून गेल्या वर्षभराच्या कालावधीत अर्धा ते पाऊस तास मुबलक पाणी येत होते. यामुळे इमारतीच्या तळटाक्या भरून इमारतीवरील टाक्यांमध्ये पाणी साठा शिल्लक राहत होता. यामुळे रहिवाशांमध्ये समाधानाचे वातावरण होते. गेल्या वीस दिवसांपासून पालिकेकडून कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे. त्यामुळे इमारतीच्या लगत असलेली पाण्याची टाकी एक ते दीड फूट भरते. एका सोसायटीत कमीत कमी २५ कुटुंबे आहेत. काही सोसायट्यांमध्ये ५० ते ६० कुटुंबे राहतात. त्यांना दिवसभरात आलेले हे पाणी पुरत नाही. त्यामुळे पालिकेच्या टँकरवर अवलंबून राहावे लागते, अशा तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत.

**नागरिक त्रस्त**

डोंबिवली पश्चिमेतील देवीचापाडा गोपीनाथ चौक भागातील श्वेता व्हिला, गुना भास्कर आर्केड, गजानन आर्केड, देवकी लक्ष्मण अपार्टमेंट, शेवंता हाईट्स, सदगुरू आर्केड आणि परिसरातील इमारतींना कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे. अनेक रहिवाशांनी या पाणी टंचाई संदर्भात पालिकेत तक्रारी केल्या आहेत. पाच महिने मुबलक पाऊस पडुनही आता पाणी टंचाई सुरू झाल्याने नागरिक त्रस्त आहेत. आता दिवाळी सणाच्या काळात ही झळ अधिक प्रमाणात बसू लागल्याने रहिवाशांचा पाणी टंचाई विषयीचा तक्रारीचा सूर वाढू लागला आहे. दिवाळी सणात सुट्ट्या असतात. पाहुणे घरी आलेले असतात. पाण्याचा वापर अधिक असतो. अशा परिस्थितीत घरात मुबलक पाणी नसल्याने नागरिक विशेषता महिला वर्गात तीव्र नाराजी आहे.

सोसायटीला कमी दाबाने पाणी पुरवठा होतो म्हणून प्रत्येक सोसायटीने आपल्या सोसायटीकडे पालिकेच्या मुख्य जलवाहिनीवरून येणाऱ्या जलवाहिन्यांची प्लम्बरकडून तपासणी करून घेतली.

महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

Government of Maharashtra

## Forest Department

### Mangrove Division- North Konkan

**Abhimaan II, 5th Floor, Teen Haat Naka, Naupada, Thane (W)-400 602**
**Email- dfommcu@gmail.com**
**Parent Portal: http://mahatenders.gov.in**

**E-Tender**
**Tender Notice No. DFO/MDNK/29/2025-26.**

Online Tender Forms in B-1 Format, for the following work are invited by the Divisional Forest Officer, Mangrove Division- North Konkan, Abhimaan II, 5th Floor, Teen Haat Naka, Naupada, Thane (W)-400 602 from the contractors registered with the Government of Maharashtra in appropriate class of Tender Notice.

The blank tender documents should be downloaded from Government website http://mahatenders.gov.in from 20/10/2025 at 11.00 am to 27/10/2025 at 11.00 am. Blank Tender documents will not be sold by this office; interested contractors have to download tender documents from the website. For any queries in this regard the interested contractors can contact on telephone no 022-69309286 during office hours.

All requisite information required for the submission of Bid Capacity documents is available on the above said website. If any assistance is required regarding e-Tendering (uploading/downloading) please contact NIC Help Desk number: 1800 3070 2232.

| Sr. | Name of work | Estimated cost | Earnest Money Deposit (Rs.) | Time limit for completion | Cost of Blank Tender Form (Non -Refundable) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | Construction of RCC Compound wall with Y-type angle & 2.45 mm dia G.I.Pipe (Rezan/concenti Deleted ire 0.75 mm dia) Near Hanuman Mandir at Kalher S.No.114/2/B/1 in in Thane (Mangrove) Range of MDNK.. | 74,34,497/- | 74,344/- | 4 Months. | Rs.1,180/- (Including GST) |

1) No changes are to be made by the contractor in the tender documents published on the website. If any changes are made the tender documents will be rejected & action accordingly will be taken against the contractor. Information published on the government website will be final.

2) Right to reject any or all the tenders without assigning any reason there of is reserved.

**ROC NO. - DGIPR/Mantralaya 2025-26/क्र-5/C३४१७**
**Date : 20/10/2025**

**Sign/-**
**Divisional Forest Officer,**
**Mangrove Division-North Konkan**

# दीपोत्सव !

## दीपोत्सव म्हणजे आनंदाचा उत्सव, उल्लासाचा उत्सव, प्रसन्नतेचा उत्सव, प्रकाशाचा उत्सव !

दीपोत्सव हा केवळ उत्सव नाही, तर उत्सवाचे स्नेहसंमेलन आहे. धनत्रयोदशी, नरकचतुर्दशी, दिवाळी, सुरू होणारे नवे वर्ष आणि भाऊबीज असे पाच उत्सव, पाच विभिन्न सांस्कृतिक विचारधारा घेऊन ह्या उत्सवात सम्मिलित झालेले आहेत. पूर्ण जाणीवपूर्वक जर हा उत्सव साजरा करण्यात आला तर मानवाला समग्र जीवनाचे सुस्पष्ट दर्शन ह्यातून मिळेल. बाहेर दिवे पेटवायचेच पण खरा दिवा तर हृदयात पेटला पाहिजे. हृदयात जर अंधार असेल तर बाहेर पेटविलेल्या पणत्यांना काही अर्थ नाही. दिवा हे ज्ञानाचे प्रतीक आहे. हृदयात दिवा लावणे म्हणजे निश्चित प्रकारच्या जाणीवेने दिवाळीचा सण साजरा करणे.

धनत्रयोदशीच्या दिवशी वित्ताला अनर्थ न मानता जीवन सार्थक करण्याची शक्ती मानून महालक्ष्मीची पूजा करायची.

नरकचतुर्दशीच्या दिवशी जीवनात नरक निर्माण करणारा आळस, प्रमाद, अस्वच्छता अनिष्टता वगैरे नरकासुरांना मारणे. दिवाळीच्या दिवशी ' तमसो मा ज्योतिर्गमय ' मंत्राची साधना करता करता जीवनपथ प्रकाशित करायचा. जीवनाच्या वहीचा आढावा घेतेवेळी जमेच्या बाजूला ईशकृपा राहावी ह्यासाठी प्रभुकार्याच्या प्रकाशाने जीवन भरून काढायचे.

नव्या वर्षाच्या दिवशी जुने वैरविष विसरून शत्रूचेही शुभचिंतन करायचे. नवे वर्ष म्हणजे शुभसंकल्पाचा दिवस.

भाऊबीजेच्या दिवशी स्रीकडे पाहाणा-या भद्रदृष्टीचे शिकवण घ्यायची आणि बंधूच्या निर्व्याज प्रेमाने संपूर्ण स्री-समाज बहिणीच्या रूपात स्वीकारायचा. सुंदर ज्ञान देणारा ज्ञानदीप जर हृदयात प्रकाशित केला तर आपले जीवन सदैव दीपोत्सवी महोत्सवासमान बनेल.

हा दीपोत्सव आपल्या सर्वांच्या जीवनात सुख, समाधान, ऐश्वर्य , आरोग्य घेऊन येवो. आणि आपल्या जीवनाचा आनंददायी प्रवास आणखी आनंददायी होवो. ह्याच या दीपोत्सवाच्या शुभेच्छा !!

॥ नातं विश्वासाचं... स्वप्न विकासाचं ॥

**ठाणे जिल्हा विद्यासेवक सहकारी पतपेढी लिमिटेड, ठाणे-पालघर**

कार्यक्षेत्र : ठाणे पालघर जिल्हा

(नोंदणी क्र. : टी.एन.ए./बी.एन.के./403 दि. 12/04/1979)

मुख्य कार्यालय : सुंदरा प्लाझा, सनई बँक्वेट इमारत, पहिला मजला, बैलबाजार, कल्याण (प.), जि. ठाणे. फोन : 7875553163

विद्यासेवकांची आर्थिक बाजू भक्कम करणारी जिल्ह्यातील नामवंत पतसंस्था

**पतसंस्थेची धोरणे व निर्णय**

- कर्जाची कमाल मर्यादा उत्पन्नाच्या प्रमाणात ५० लाखापर्यंत
- परतफेड हप्ते १८० महिने
- आर्टिकल कर्ज ५ लाख व वैद्यकीय कर्ज रु. ३ लाखापर्यंत तात्काळ उपलब्ध
- ठेवींवर आकर्षक व्याज
- सतत "अ" ऑडिट वर्ग
- संस्थेची उलाढाल २८४ कोटी (आर्थिक वर्ष -२०२४-२५)
- कन्यादान व आहेरमान योजनेद्वारे पतसंस्थेच्या एका मुलीस किंवा मुलास विवाह प्रित्यर्थ रु. ५५५५/- रकमेचा धनादेश (लवकरच या रक्कमेत वाढ करण्यात येईल.)
- कर्जावरील व्याज दर १०% (EMI पध्दतीने)
- सणांसाठी तात्काळ रु.७५०००/- हजार फेस्टिवल कर्ज
- ९० महिन्यात ठेवीची रक्कम दुप्पट
- आपत्तीग्रस्त व आजाराने पिडीत सभासदांना कल्याण निधीतून यथोचित मदत
- सभासद संख्या १००००/- पर्यंत वाढवण्याचे ध्येय
- साधारण व आर्टिकल कर्जासाठी स्वतंत्र कर्ज विम्याच्या योजना
- मृत्युफंड योजना - सभासदाच्या मृत्यु पश्चात त्याच्या वारसास तात्काळ रु. ५० हजार मर्यादेपर्यंतची आर्थिक मदत
- संस्थेचा विस्तार ठाणे व पालघर जिल्ह्यात 8 शाखांद्वारे चालू





अनुदानित शाळा व महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर बंधु भगिनी

लवकरात लवकर सभासद व्हा व आपल्या विकासाचं स्वप्न साकार करा

**संचालक मंडळ सन २०२२-२३ ते २०२६-२७**

श्री. सुधीर देवराम घागस (अध्यक्ष)
श्री. दिगंबर रमेश बेंडाळे (उपाध्यक्ष)
श्री. दुर्जन नामदेव भोईर (कोषाध्यक्ष)
सौ. सायली रमेश बुटेरे (कार्यवाह)

श्री. प्रशांत तुकाराम भामरे
श्री. संदिप विठ्ठल कालेकर
श्री. संदेश धर्मा पाटील
सौ. संगिता प्रकाश पाखले
श्री. शैलेश नाना भोईर
श्री. ज्ञानेश्वर त्र्यंबकगीर गोसावी
श्री. सुरेश अण्णा सापळे
श्री. गजानन श्रीराम पाटील
श्री. धनाजी तुकाराम दळवी
श्री. राजेंद्र यादवराव गवळी
श्री. किशोर हेमराज राठोड
श्री. थॉमसकिशोर जे. शिनगारे

श्री. अनंत रुपचंद कान्हेरकर (व्यवस्थापक तथा कार्यालक्षी संचालक)
श्रीम. दिपाली माहे (उपव्यवस्थापक)
श्री. समीर राजे (हिशोबनीस)



**श्री. सुधीर देवराम घागस** अध्यक्ष

# ग्रुप ग्रामपंचायत कुरुंद, ता. भिवंडी, जि. ठाणे

**ग्रामपंचायतीतील सर्व नागरिकांना दिपावली तसेच नववर्षाच्या अनंत शुभेच्छा ! ही दिवाळी आपणा सर्वांना सुख, समृध्दी, आनंद, भरभराटी व समाधानाची जावो ही सदिच्छा !**



सौ.दिपाली दिलीप केदार
( सरपंच )



सौ. निकिता मुकेश जाधव
( उपसरपंच )



श्री. नितीन परशराम देशमुख
(ग्रामविकास अधिकारी)

शुभ दीपावली

श्री. श्रीकांत रामचंद्र गायकर ( सदस्य )
सौ. जान्हवी जगदीश पाटील ( सदस्य )
श्री. भाई हरिभाऊ पाटील ( सदस्य )
सौ. विशाखा विशवनाथ भोईर (सदस्य )
कु. रेश्मा गणेश वाघे (सदस्य)
श्री योगेश भगवान पाटील ( सदस्य )
श्री सुनील रामचंद्र मोरे (सदस्य )
श्री. संदिप गुरुनाथ काठोळे (सदस्य )
सौ. भावना भगवान सांबरे (सदस्य )

**सामान्य प्रशासन कर्मचारी वृंद विभाग**

सौं शितल विकास पाटील (लिपिक )
श्री, रवींद्र विठ्ठल घोडविंडे ( दिवाबत्ती /सहाय्यक लिपिक )
श्री. पंकज शनिवार जाधव - (वसुली लिपिक / शिपाई

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की सर्वांनी ग्राम पंचायतीचे सर्व प्रकारचे कर वेळीच भरून गावचे विकासकामांना हात भार लावून मोलाचे सहकार्य करावे, ही विनंती !

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com



# प्रदूषणमुक्त दिवाळीसाठी पर्याय

आज आपण फटाके न फोडता अनेक पर्यायी मार्गाने दिवाळी साजरी करू शकतो. घरी मातीचे दिवे लावा, रांगोळीने घर सजवा, आकर्षक कलाकृतीने कंदील बनवून लावा आणि परिसर सुंदर ठेवा. घरगुती फराळ तयार करा आणि आप्तेष्टांना तसेच गरजूना वाटप करा. लहान मुलांना याचे महत्व पटवून देणाऱ्या लोकशाहीत्यातील गोष्टी सांगा, मैदानी व बौद्धिक खेळ खेळा, आपल्या गल्लीत या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करा. गरजू लोकांना कपडे, अन्न किंवा मिठाई वाटा. झाडे लावा व ते जगवण्यासाठी प्रयत्न करा, विविध सामाजिक उपक्रमात भाग घ्या. सोशल मीडियावरून फटाके मुक्त दिवाळीबद्दल लोकांमध्ये जनजागृती करा. शेवटी दिवाळीचा मूळ उद्देश हा आनंद, एकता आणि सकारात्मकता पसरविण्याचा आहे. दिवाळीसाठी हल्ली बाजारात मातीसोबतच वेगवेगळ्या प्रकारचे दिवे पाहायला मिळतात. मात्र प्लास्टिक किंवा इतर मटेरियल ऐवजी मातीचे दिवेच लावा. बाजारात मातीचे विविध आकार, डिझाईन आणि पॅटर्नचे दिवे मिळतात. तुम्ही साध्या पणत्यांसोबतच लटकणारे, मोठे स्टँडवाले दिवे घेऊ शकता. गाईपासून असंख्य फायदे असल्यामुळे तिला हिंदू धर्मशास्त्रात गो-माता म्हटल्या जाते. गाईच्या शेणामध्ये सुद्धा लक्ष्मीचा वास असतो असे आपलं धर्मशास्त्र सांगतं. हे महत्त्व ओळखून गाईच्या शेणापासून दिवाळीचे विविधरंगी दिवे तयार करून दिवाळी साजरी करूया. हे दिवे बाजारात उपलब्ध असून त्यांना प्रचंड मागणी देखील आहे. दिवाळीत घर सजवण्यासाठी नेहमी विविध दुकानांमधून वस्तू खरेदी केले जातात. पण यावेळी तुमची थोडी क्रिएटिव्हीटी वापरा. तुम्ही घरात विविध रंगांच्या ओढणी, जुन्या साड्यांचा वापर करुन डेकोरेशन करु शकता. याशिवाय तुम्ही झेंडू, गुलाबाची फुलं, शेवंतीचे फुलं, आंब्याची पाने यांचा सुद्धा वापर करुन घर सजवू शकता. दिवाळीत अनेक लोक घरी पार्टी ठेवतात किंवा नातेवाईक, मित्र मंडळी एकमेकांकडे जाउन दिवाळीच्या शुभेच्छा देतात. यावेळी अनेक लोक पाहुण्यांना डिस्पोजेबल प्लेट्स किंवा ग्लासेस मध्ये नास्ता वगैरे देतात. हे पर्यावरणासाठी चांगले नाही. त्याऐवजी तुम्ही बायोडिग्रेडेबल प्लेट्स आणि ग्लासेसची निवड करावी जी पर्यावरणासाठी अनुकूल आहेत आणि त्याच वेळी विल्हेवाट लावणे सोपे आहे. केळीच्या पानांच्या प्लेट्स, बांबूच्या प्लेट्स या सणाच्या मेजवानीसाठी उत्तम पर्याय आहेत. प्रदूषण, त्रास आणि अपघात यांना प्रोत्साहन देणे, हे या सणाच्या मूळ हेतूच्या विरुद्ध आहे. त्यामुळे आपण सर्वांनी मिळून फटाके मुक्त, पर्यावरणपूरक आणि आरोग्यदायी दिवाळी साजरी केली पाहिजे. ही जबाबदारी केवळ सरकार किंवा पालकांची नाही, तर प्रत्येक नागरिकाची आहे.



# चला , साजरी करू या पर्यावरण पूरक दिवाळी

(श्री गिरीधर पिंगळे गुरुजी गोरठण बुद्रुक खालापूर मोबा. ९७२३७७९६०६)

भारतीय संस्कृती विविध सण समारंभ यांनी ओतप्रोत भरलेली आहे त्यातील प्रत्येक सणासाठी एक वेगवेगळा संदर्भ आहे. आपल्या नैमित्तिक जीवनात ज्यानी ज्यानी आपल्याला कोणत्या ना कोणत्या मार्गाने उपयुक्तता सिद्ध केली आहे त्या सर्वांचा उतराई होण्यासाठीच आपण समारंभ साजरे करतो. उदाहरण द्यायचे झाल्यास आपण बैल, नाग, नारळ, गाय, वासरू, झाड,(वड) दिवा, नांगर, पैसा अशा अनेक विविध प्राणी पक्षी झाडे यांची वेगवेगळ्या दिवशी पूजा करतो म्हणजेच सण साजरे करतो या सर्व सणांमध्ये ज्या सणाला जास्त महत्त्व आहे तो सण म्हणजे दिवाळीचा सण.

दिवाळीचा सण हा सहा दिवसांचा आहे. जसे की वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा भाऊबीज असा आहे. दिवाळी सुरू होण्याअगोदर घराघरात फराळांची धामधूम असते, पदार्थात चकली करंजी शेवचिवडा शंकरपाळी असे अनेक पदार्थ बनवले जातात. पदार्थ बनवताना काळजी घेणे जरुरीचे असते नाहीतर पदार्थ एकपट अन अनर्थ अनेकपट अशी गत होता कामा नये. दिवाळीमध्ये सर्व कुटुंबाने एकत्र येऊन पदार्थ सेवन केले जातात तसेच सदर पदार्थ आपण आप्तेष्टांना व पै पाहुणे यांना खाऊ घातले जात आता एकंदर कुटुंब आहेत तरी कोठे?



आपण दिवाळीत फटाके फोडतो त्याचा इतका भडिमार होतो की त्याचे काय परिणाम होतील याची जाणीव आपल्याला राहत नाही फटाके वेगवेगळ्या प्रकारचे असतात काही फटाके तडतडणारे काही प्रखर प्रकाश देणारे काही कानठळ्या बसवणारे काही केवळ धूर काढणारे असतात. दिवाळी केवळ सहा दिवसांच असते परंतु त्या फटाक्यांच्या होणाऱ्या दुखापतीमुळे त्याचे परिणाम आयुष्यभर राहतात.

उदाहरण द्यायचे झालेच आम्ही गावी होतो मौज म्हणून आम्ही फटाके फोडले होते शेजारच्या मुलाचा एक फटाक्याचा कोजळा पेंढ्याच्या मांडवावर पडला पेंढ्यांनी पेट घेतला अग्नीच्या ज्वाला भयानक दिसत होत्या मांडवा जवळ एक झोपडी वजा घर होते त्या घरालाही आग लागली ही बातमी गावभर पसरली सर्व लोकांनी आग विझवण्यासाठी धाव घेतली प्रत्येकाने आपल्या घरातून कोणी हंडा कोणी बादली लहान मुलांनी तांबे भरून पाणी आणले आग विझवताना सर्व गावकऱ्यांच्या तोंडाला फेस आला शहरासारखे बंब गावात नसतात ना? एक छोटासा फटाका केवढ्याला पडला!

दुसऱ्या एका घटनेत मी त्याचवेळ आठवीत असेल माझा मोठा भाऊ त्यावेळी मुंबईत एका रेडिमेड कापड बनवणाऱ्या कंपनीत टेलर म्हणून काम करीत होता दिवाळीचे दिवस होते त्यांच्या कंपनीचे काम तळमजल्या पासून तीन मजल्यापर्यंत चालत होते खालच्या भागात शिलाई मशीन होत्या पहिल्या मजल्यावर काज, बटन ही कामे होती दुसऱ्या मजल्यावर इस्त्रीचे काम चाले. एक दिवस दिवाळीत या कंपनीच्या शेजारील मुलांनी आकाशात फुटणारा फटाका म्हणजे 12 शॉट फटाका लावला त्या फटाक्याचा एक जळता कण इस्त्री असणाऱ्या गादीवर जाऊन पडला त्याचा मोठा धमाका झाला दुसऱ्या माळ्याला आग लागली त्यात दोन्ही मजले जळून खाक झाले.पाण्याचे बंब आले परंतु इस्त्री गादीवर होत असल्यामुळे कापसाची आग त्वरित विझत नाही तर ती धुमसत राहते त्यात कोट्यावधीचे नुकसान झाले विमा होता म्हणून तो कारखानदार वाचला परंतु ही संपत्ती आपल्या देशाची आहे ती भरून निघणार आहे का?

गेल्या दोन वर्षांपूर्वी आम्ही लक्ष्मीपूजनाच्या रात्री पूजन झाल्यावर आम्ही बारा शॉट फटाका लावला लावताना थोडी गडबड झाली फटाक्याचा बॉक्स थोडा कळलेला ठेवला होता बारा शॉट पैकी सहा शॉट सरळ होते नंतर मात्र बॉक्स आमच्या घराकडे कलंडला अन उरलेले सर्व शॉट आमच्या घराकडे येत होते नशीब

बलवत्तर म्हणून कोणत्याही वस्तूने पेट घेतला नाही परंतु आमच्या घरातील एक ज्येष्ठ व्यक्तीच्या कानाजवळ एक शॉट फुटला सर्वजण पळाले मात्र जेष्ठाला पळता आले नाही. ज्येष्ठ व्यक्तीचा एका कानाचा पडदाच फाटला तर एका कानाने ऐकू येईनासा झाला. आमची दिवाळी दुःखात रूपांतरित झाली त्या ज्येष्ठांचा कान अजून बरा झालेला नाही यासाठी चार ओळी

**आली दिवाळी**
**आनंद नाही तोटा**
**पै पै पैशाला येथल हजार वाटा**
**दारू गोळा उडवीती फटाका**
**जीव जीवाला बसतो फटका**

त्यासोबत फटाक्यांच्या आवाजाने शेजार पाजारातील आजारी व्यक्तींना त्रास होतो तसेच ध्वनी प्रदूषण होते आपल्याला कळत नाही तरी आपल्या कानाच्या पडद्यावर परिणाम होतो. लग्नाच्या वेळी डीजे वाजत असताना होणारा त्रास आपण अनुभवत असतोच ना! तसेच फटाक्यांच्या दारूचा वास ही आपल्या जीवनाला घातक आहे. फटाक्यांच्या प्रखर प्रकाशात आपल्या डोळ्यावर परिणाम होऊ शकतो. काही मुले व माणसे फटाका लावताना एखादा फटाका एवढ्या लवकर फुटतो की त्या मुलाला, माणसाला पळण्याचा अवधी मिळत नाही त्यामुळे कित्येकांचे डोळे कामातून गेल्याची उदाहरणे थोडकी नाहीत.

दिवाळीचा आनंद घ्या पण जरा जपून आपण दिव्याकडे पाहिल्यास आपणास दिसून येईल की तो सांगत असतो माझ्यासारखे संथपणे तेवत राहा, आपला प्रकाश दुसऱ्याच द्या, आपल्या जवळचा प्रकाश म्हणजे आपल्याला मिळालेले ज्ञान, अनुभव दुसऱ्याच द्या, त्याचा फायदा सर्व जणांना होईल म्हणून सर्वजण शुभम करोति म्हणताना

**दिव्या दिव्या दीपत्कार**
**कानी कुंडल मोती हार**
**दिव्यास पाहून नमस्कार**
**दिवा लावला देवापाशी**
**उजेड पडला तुळशीपाशी**
**माझा नमस्कार सर्व देवांशी**

जाता जाता एवढेच म्हणावेसे वाटते फटाके फोडताना कोणालाही इजा होणार नाही हे पाहावे. मनाला शांत करणारे फटाके फोडा आपणास वाटत असेल की आम्ही थोडी सुद्धा मौजमजा करू नये का ?आनंद घ्या पण संयम ठेवूनच!

पर्यावरण म्हणजे नेमके तरी काय आपल्याला पृथ्वीभोवती ज्या गोष्टी आहेत त्या पर्यावरणात मोडतात पृथ्वीचा भूगर्भही त्याला अपवाद नाही. सणासाठी लागणारी झाडाची पाने काढताना जरा जपून काढा. झाडाला कोणतीही इजा होणार नाही हे पाहावे आपणास हवी तेवढीच पाने घ्यावीत. उगाच भाराभर पाणी तोडू नये सोन्याचे अंडे देणारी कोंबडी खाण्यासारखे करू नये काही. व्यक्ती झाडावर रोषणाई करतात व झाडाला तोरणे बांधतात त्यामुळे जणू झाडांना वेठीस धरण्यासारखे आहे. झाडांना त्रास होतो रोषणाई करताना विजेच्या वस्तूंपासून सावध राहावे नाही तर रोषणाई महागात पडल्याशिवाय राहणार नाही. दिवाळीचा आनंद घेताना कोणती काळजी घ्यावी यासाठी हा खटाटोप. ही दिवाळी आपणा सर्वांना सुख समृद्धी व आरोग्याची जावो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**घरापुढे काढली रांगोळी**
**तुळशीत लावला दिवा**
**आली प्रेमभराची दिवाळी**
**जनसामान्यांच आनंद**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com



# दिवाळीतून समरसता...

**मी अविवेकाची काजळी ।**
**फेडूनि विवेकदीप उजळी।**
**ते योगिया पाहे दिवाळी ।**
**निरंतर ।।**

विवेकदीपास आलेली अविवेकरुप काजळी झाडून तो विचाररुप दिवा प्रज्वलित करतो. त्यावेळी योगी लोकांना निरंतर आनंदमय, तेजोमय अशा दिवाळीचा सुवर्ण दिवस उगवतो.

भारत हा विविधतेने नटलेला, समृद्ध असा सांस्कृतिक वारसा असलेला महान देश आहे. आपल्या देशात अनेक धर्म, पंथ, जाती, परंपरा, प्रांत, भाषा, पोशाख, अन्नसंस्कृती आदी सर्वांमध्ये अपार वैविध्य आहे. भारतात होळी, महाशिवरात्री, गणेशोत्सव, रामनवमी, नवरात्री, ईद, नाताळ, ओणम, बैसाखी असे अनेक सण आणि राष्ट्रीय उत्सव मोठ्या आनंदाने साजरे करतो. आपल्याकडील दहीहंडी, नवरात्रीचा गरबा, गणेशोत्सव या सणांमध्ये मोठ्या प्रमाणात लोकसमूह सहभागी करून घेणारी उत्सव परंपरा आहे. रामनवमी, हनुमान जयंती, महाशिवरात्री, नाताळ या धार्मिक सणांमधून भक्तिभाव आणि समान श्रद्धा निर्माण होते. मकरसंक्रांती सणाला "तिळगुळ घ्या गोड गोड बोला" असे गोड बोल समरसता व सौहार्दता यांचा संदेश देतो. प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन अशा राष्ट्रीय उत्सवांतून धर्मनिरपेक्ष समरसतेचे दर्शन घडते. म्हणूनच, सण-उत्सव हे समाजातील क्षमाशीलतेचे व प्रेमाचे प्रतीक समजले जातात. आपण सर्व धर्म, पंथ, प्रांत, जात, भाषा, लिंग या सर्वांमध्ये भेदभाव न ठेवता एकता, समता व बंधुभावाच्या नात्याने जगतो. एकमेकांचा आदर करत विविध सण, उत्सव, परंपरा, कार्यक्रम अतिशय उत्साहाने साजरे करत असतो, याचे महत्वाचे कारण म्हणजे आपल्यातील समरसता ! आपल्या सर्वांमध्ये एकता, समता व बंधुतेच्या उदात्त भावनेने एकत्र बांधून ठेवणारा सुंदर धागा म्हणजे 'समरसता' आहे. "समरसता" हा शब्द "सम" (समान) व "रस" (भाव) या दोन शब्दांपासून तयार झाला आहे. मनात कोणत्याही प्रकारचा भेदभाव न ठेवता सर्वांना समान भावाने पाहून एकात्मतेचा अनुभव देण्याची अवस्था म्हणजे 'समरसता' होय. ती एक मानवी आंतरिक शक्ती आहे. 'समरसता' ही सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, राष्ट्रीय, आध्यात्मिक अशा विविध प्रकारची असते.

संतांनी या समरसतेचा पाया घातला. संत साहित्यात "समरसता" या भावनेला अत्यंत महत्वाचे स्थान होते. संतांनी समाजातील भेदभाव, अन्याय आणि अहंकार दूर करून "सर्व जीवात एकच परमात्मा" आहे, हीच समरसतेची शिकवण दिली. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या ओव्यांतून समरसतेचा विचार अत्यंत गूढ व व्यापकपणे मांडला. "जीवो जीवासी न विरे, सर्वत्र तोचि ईश्वर ठरे। जेथ भेद बुद्धि नसे, तेथ समरसता असे।।" ही ओवी संत ज्ञानेश्वरांच्या अद्वैत वेदांताच्या तत्त्वज्ञानावर आधारित आहे. 'प्रत्येक जीव हा एकमेकांपेक्षा वेगळा नसतो, तर तो एकच ईश्वराचा अविभाज्य भाग आहे. जिथे 'भेद' किंवा 'फरक' करण्याची बुद्धी नसते, तिथे 'समरसता' म्हणजेच समानता आणि एकरूपता असते.' संत तुकाराम महाराज सांगतात, "विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म, भेदाभेद भ्रम अमंगळ।।" 'वैष्णवांचा धर्म म्हणजे सर्वत्र विष्णू पाहणे असा असल्याने भेदाभेदाचा विचार करणे अमंगळ आहे. तुकोबांच्या अभंगांमध्ये अशा खऱ्या समरसतेचा विचार अत्यंत ठामपणे दिसून येतो. संत एकनाथांनी भेदभाव सोडून सर्व माणसांमध्ये देव पाहिला. त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध भूमिका घेऊन प्रत्यक्ष कृतीतून समानतेचा संदेश दिला. संतांनी हा संदेश पुढे नेऊन समाजात भेदभावविरहित, प्रेमभावयुक्त जीवनमूल्ये रुजवली.

दिवाळीतून समरसतेचा विचार करता, ही समरसता आपल्याला दिवाळी सणाच्या कालावधीत प्रत्येक दिवशी प्रकर्षाने जाणवते. क्षणोक्षणी त्याची प्रचिती येत असते. वसुबारस, धनत्रयोदशी, लक्ष्मीपूजन, नरक चतुर्दशी, बलिप्रतिपदा, भाऊबीज अशा विविध परंपरा, चालीरीती आणि विधींचे पालन करून सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक व आध्यात्मिक समरसता निर्माण केली जाते. दीपोत्सव - दिव्यांची रोषणाई, रांगोळी, आतिषबाजी, सजावट यातून नवचैतन्याचा आविष्कार पाहावयास मिळतो. दिवाळीत आपण आपापल्या घराची व परिसराची स्वच्छता, साफसफाई आणि सुंदर सुंदर सजावट करत असतो. ज्यामुळे घर-दाराचे नूतनीकरण होऊन सर्वत्र एक प्रकारचे नवचैतन्य निर्माण होते. दिवाळी हा सण आपल्यातील अज्ञान दूर करून ज्ञानाचा प्रकाश पसरवण्याचे प्रतीक आहे. नकारात्मकता काढून



आत्मा शुद्ध करणारी सकारात्मकता वाढवण्याची संधी देणारा सण आहे. दिवाळी हा वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतीक आहे. पावसाळ्यानंतर येणाऱ्या समृद्धीचा उत्सव म्हणजे दिवाळी सण असतो. या काळात लोक निसर्गातील सर्व घटकांप्रती आणि एकमेकांप्रती कृतज्ञता व आदर व्यक्त करतात, ज्यामुळे समाजात सकारात्मक वातावरण निर्माण होते. मनाला नव उभारी मिळते. 'शेतकरी' हा जगाचा पोशिंदा आहे. दिवाळी काळात धान्य तयार होऊन ते शेतकऱ्याच्या घरी आल्याने शेतकऱ्याचा आनंद गगनात मावेनासा होतो. त्यामुळे हा सण ग्रामीण भागात सर्वत्र कृषीविषयक आनंदाचा उत्सव म्हणून मोठ्या आनंदाने साजरा केला जातो. दिवाळीत पंचमहाभूते आणि लक्ष्मी व विष्णू अशा इतर देवी-देवतांचे, निसर्गातील विविध घटकांचे पूजन केले जाते, गोवर्धन पूजा केली जाते. असे करून निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करून आध्यात्मिक, सामाजिक व सांस्कृतिक समरसता वृद्धिंगत होते.

तमसो मा ज्योतिर्गमय... म्हणजे, अंधाराकडून प्रकाशाकडे वाटचाल करणे. दिवाळी हा सण आपल्याला अंधारातून उजेडाकडे, अज्ञानातून ज्ञानाकडे नेतो. वाईटावर चांगल्याचा विजय दर्शवतो, ज्यामुळे समरसतेची भावना वाढते. अज्ञानरूपी अंधःकाराचा नायनाट करून ज्ञानरूपी प्रकाशाचा दिवा सदैव आपल्या मनात तेवत ठेवण्याचा संदेश दिवाळी सणातून मिळतो. ज्यामुळे लोकांच्या मनात सकारात्मकतेच्या भावनेबरोबर जीवन जगण्याची एक नवी आशा पल्लवित होते. विविध धर्मांचे लोक एकत्र येऊन दिवाळी सण साजरा करण्यातून एकमेकांमध्ये आपुलकी, प्रेम, आदर आदी गोष्टी निर्माण होतात. त्यामुळे या सणाच्या माध्यमातूनच लोकांचे परस्परामंध्ये संबंध अधिक दृढ होतात आणि सर्वांना एकात्मतेच्या धाग्याने एकत्र आणून आनंद आणि समृद्धी मिळते. 'सत्यम्, धर्मः, मैत्री च समाजस्य आधारः'- सत्य, धर्म, मैत्री हे समाजाचे पाया आहेत.

'समरसता' म्हणजे समाजातील सर्व घटकांमध्ये भेदाभेद न ठेवता एकत्व, बंधुभाव, आणि समानतेचा भाव निर्माण करणे, हा विचार दिवाळी सणाद्वारे अतिशय सुंदररीत्या व्यक्त झालेला दिसून येतो. दिवाळीच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणणारा प्रेम, सेवा व भक्तीरुपी समरसतेचा सूत्रधागा असतो, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

दिवाळी सणाप्रसंगी आयोजित केलेल्या मेळावे, कार्यक्रम आणि सामुदायिक उत्सवांमध्ये सर्व स्तरांतील लोक एकत्र येतात. पोशाख, सजावट, खाद्यसंस्कृती या सगळ्यातून सांस्कृतिक आदानप्रदान होऊन त्यातून सांस्कृतिक समरसतेचे प्रदर्शन घडते. दिवाळीच्या काळात आपण परस्परांना मदत करतो. समाजातील उच्च-नीच, गरीब-श्रीमंत, काळा-गोरा इत्यादी भेद मनात न बाळगता सर्वजण एकत्र येऊन आरती, भजन, स्वच्छता मोहिमा व सांस्कृतिक कार्यक्रम करतो. याप्रसंगी नृत्य, गायन व वादन यांचा अनोखा संगम पाहवयास मिळतो. भारतीय समाजजीवनात समानता, समंजसपणा, प्रेम, आदर आणि परस्पर सहकार्याने वागण्याची भावना दिसून येते. दिवाळीच्या माध्यमातून आपण भेदभावरहित अशा सामाजिक एकात्मतेचे दर्शन घडवत आनंदाच्या क्षणांची अनुभूती घेत असतो. दिवाळी सण हा सामाजिक ऐक्य, धार्मिक सहिष्णुता आणि मानवतेच्या समरसतेचे प्रतीक असून त्यातून "विविधतेतून एकता" हा उदात्त संदेश प्रत्यक्ष अनुभवायला मिळतो.

"आपण सर्वजण एकाच परमेश्वराची लेकरे आहोत. सर्व जीवात एकच परमात्मा आहे, म्हणून कोणीही मोठा किंवा कोणीही लहान नाही." ही आपली विचारधारा फार प्राचीन काळापासून चालत आलेली असून वेदांनी, संतांनी, विचारवंतांनी आपल्या विचारातून ती वेळोवेळी मांडली आहे. आपण सर्वांनी ती स्वीकारली आहे. त्यामुळेच आपण भेदाभेद न मानता एक होऊन देशाला प्रगतीच्या दिशेने नेण्यासाठी मार्गक्रमण करत आहोत. दिवाळी सारख्या सणाच्या माध्यमातून समरसतेमुळे सर्वांना समान संधी देणारी सामाजिक रचना निर्माण होत असते. यावेळी आपण इतरांच्या धर्म, संस्कृती, भाषा, विचारधारा व श्रद्धांचा आदर ठेवून परस्पर सहकार्याची वृत्ती जोपासत असतो. 'समरसता' ही एक समग्र मानवी मूल्य समाजात समानता, बंधुता निर्माण करून एकत्वाची अनुभूती देते. ती व्यक्ती व्यक्ती मधील अहंकार, द्वेष व मत्सर आदींचा त्याग करून एकमेकांत प्रेमभाव व आपुलकी जोपासते. समरसतेमुळे समाजातील प्रत्येक घटकाला प्रगत, स्थिर आणि आनंदी जीवन जगता येते. या सर्व गोष्टी आपल्याला दिवाळी सण साजरा करताना समजतात. दिवाळी हा फक्त एकाच धर्माचा सण नसून, हिंदू, शीख, जैन यांसारख्या विविध धर्मांचे लोक तो साजरा करतात. यातून सांस्कृतिक विविधता दिसून येते. यातूनच माणसा-माणसांतील संबंध अधिक घट्ट होतात आणि सामाजिक समरसतेची भावना अधिक दृढ व मजबूत होते. दिवाळीत आपापले कुटुंबीय, नातेवाईक एकमेकांपासून कितीही दूर असले तरीही ते एकत्र येतात. 'सर्वेभ्यः सखाः सर्वेभ्यः प्रियं भवतु' - दिवाळीत हे लक्षात घेऊन आपण सर्वांसोबत मैत्रीपूर्ण संबंध ठेवतो. लोक एकमेकांच्या घरी जाऊन शुभेच्छा देतात, मिठाई वाटतात, भेटवस्तू देऊन फराळाचा मनमुरादपणे आनंद लुटतात. आपापसांतील वैरभावना विसरून एकमेकांच्या आनंदात सहभागी होतात. 'एकत्वे सर्वजनानां सुखम्' - सर्वांमध्ये ऐक्य असल्यासच आनंद प्राप्त होतो, याची अनुभूती दिवाळीत येते. त्यामुळे दिवाळीच्या उत्सवातून समाजात दीर्घकाळ टिकणारा एकोपा, बंधुभाव व सलोखा वाढतो. समरसता म्हणजे सामाजिक, धार्मिक, जातीय किंवा वैयक्तिक भिन्नता असूनही एकत्र राहणे, सुसंवाद राखणे, वैमनस्य न ठेवता सौहार्दपूर्ण संबंध ठेवणे होय. म्हणूनच, 'सर्वजनहिताय सर्वजनसुखाय' हा उदात्त हेतू नजरेसमोर ठेवून दिवाळी सणातून आपण सर्वांच्या सुखासाठी समरस झालो पाहिजे.

थोडक्यात, 'समरसता' म्हणजे समभावाचा, एकात्मतेचा व सौहार्दाचा व्यापक असा जीवनदृष्टिकोन व्यक्त करणारी भावनायुक्त कृती आहे. समरसता ही केवळ सामाजिक कल्पना नसून जीव व शिव यांना एकत्रित बांधणारी उदात्त व व्यापक अशी भारतीय संस्कृतीची महान विचारधारा आहे. अशी ही 'समरसता' दिवाळी सारख्या सण-उत्सवांमधून सर्वाधिक प्रभावीपणे आणि स्पष्टपणे अगदी सहजतेने दिसून येत असल्याने ती आपण जपली पाहिजे. समाजाच्या सर्वांगीण कल्याणासाठी दिवाळीच्या सणाद्वारे सर्वांनी समान भावना ठेऊन 'समरसता' जोपासली पाहिजे. दिवाळी उत्सवाच्या पावन पर्वावर आपण ऐक्य, सत्य, धर्म, मैत्री, करुणा यांचा स्वीकार करून राष्ट्रकल्याणासाठी समरसता टिकवून ठेवणे, ही काळाची गरज आहे. कारण, 'मित्रत्वं, सहिष्णुता, सौहार्दं च समरसता मूलम्' - मित्रत्व, सहिष्णुता, सौहार्द या सर्व मूल्यांनी समरसतेचा पाया रोवला आहे. समरसतेचा पाया अधिक मजबूत करणे ही आपल्या सर्वांची नैतिक जबाबदारी आहे. हे लक्षात घेऊन हा पाया अधिक मजबूत करण्यासाठी दिवाळीच्या या मंगलसमयी सर्वांसाठी प्रार्थना करू या...

**'सर्वे भवन्तु सुखिनः, सर्वे सन्तु निरामयाः' - सर्वजण सुखी राहोत, निरोगी राहोत !**

**- लेखक -**
**शारदासुत सुनील म्हसकर, शहापूर (शिक्षणतज्ज्ञ व प्रज्ञावंत साहित्यिक)**
**संपर्क - ९०२९३०२१११ / ९००४१११९५६**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com



# दीपावली या शब्दाची उत्पत्ती!

दिवाळी या सणाला दीपावली असे देखील म्हणले जाते. दीपावली या शब्दाची उत्पत्ती संस्कृत मधील दोन शब्दांच्या उच्चाराने झाली. "दीप" म्हणजे "दिवा" आणि "आवली" म्हणजेच "ओळ". याचा संपूर्ण अर्थ पाहिला तर दिव्यांची एका ओळीत केलेली रचना अर्थात दिवाळी. काही जण दिपवाळी असे देखील म्हणतात, पण शुद्ध शब्द हा दीपावली आहे. वेगवेगळ्या शब्द प्रयोगानुसार त्याचा उच्चार बदलतो. पण अर्थ एकच आहे. दीपावलीचे मूळचे नाव यक्षरात्री असे होते हे हेमचंद्राने नोंदवले आहे, तसेच वात्स्यायनाच्या कामसूत्रातही हेच नाव नोंदलेले आहे. नीलमत पुराण या ग्रंथात या सणास "दीपमाला" असे म्हणले आहे. कनोजाचा राजा हर्षवर्धन याने नागानंद नाटकात या सणाला "दीपप्रतिपदुत्सव" असे नाव दिले आहे. ज्योतिषरत्नमाला या ग्रंथात "दिवाळी" हा शब्द वापरला आहे. भविष्योत्तर पुराणात दिवाळीला "दीपालिका" म्हणले आहे, तसेच काल्विवेक या ग्रंथात तिचा उल्लेख "सुखरात्रि" असा येतो. व्रतप्रकाश नावाच्या ग्रंथात "सुख सुप्तिका" म्हणून दिवाळी ओळखली जाते









# ठाण्याची दिवाळी परंपरा आणि आधुनिकतेचा संगम ! 'गोधन पूजन' ते 'माणूसकीची दिवाळी'

● मनोज शिवाजी सानप
जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे





दिवाळी, म्हणजेच दिव्यांचा सण..! हा केवळ प्रकाशाचा उत्सव नसून, तो महाराष्ट्राच्या आणि विशेषतः ठाणे जिल्ह्याच्या संस्कृती, परंपरा आणि जीवनशैलीचा आरसा आहे. आधुनिकतेची झगमग आणि ग्रामीण भागातील पारंपारिक प्रथा यांचा सुंदर मिलाफ ठाण्याच्या दिवाळीत पाहायला मिळतो. जिल्ह्याच्या शहरी आणि ग्रामीण भागातील दिवाळी साजरी करण्याच्या पद्धतींमध्ये विविधता असून, प्रत्येक ठिकाणी एक खास आणि वैशिष्ट्यपूर्ण अनुभव मिळतो.

## ठाणे जिल्ह्यातील दिवाळीची वैशिष्ट्ये आणि परंपरा

ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात दिवाळीला विशेष महत्त्व आहे. हा सण म्हणजे पावसाळ्यानंतर शेतीत नवीन धान्याची 'भात' (धान्य) घरी आल्याचा आनंदोत्सव असतो. शेतकऱ्यांसाठी दिवाळी म्हणजे कष्ट फळाला आल्याची कृतज्ञता व्यक्त करण्याची वेळ. शहरी भागांत रोषणाई, आकर्षक आकाशकंदिल आणि फटाक्यांची आतषबाजी यावर भर असतो, तर ग्रामीण भागात मातीच्या पणत्या, राखेच्या रांगोळ्या आणि पशुधनाचे पूजन या पारंपरिक गोष्टींना आजही महत्त्व दिले जाते.

### ■ 1. बलिप्रतिपदा आणि गोधन पूजन (गुरांना आग ओलांडण्याची प्रथा)

दिवाळीचा दुसरा दिवस म्हणजे बलिप्रतिपदा (दिवाळी पाडवा), हा ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण आणि आगरी समाजात अत्यंत उत्साहाने साजरा होतो. कृषी संस्कृतीमध्ये मोलाचा वाटा असलेल्या पशुधनाचे (गुरं-ढोरं) पूजन या दिवशी केले जाते.

जनावरांची पूजा: वर्षभर शेतीत मदत करणाऱ्या गायी-म्हशींना, बैलांना पाडव्याच्या दिवशी स्वच्छ अंघोळ घातली जाते. त्यांच्या शिंगांना फुगे बांधून, अंगावर गेरू आणि पांढऱ्या रंगाचे हाताच्या पंजाचे ठसे उमटवून, झालर आणि घुंगरू बांधून त्यांना सजविले जाते.

आग ओलांडण्याची प्रथा: पूजनानंतर, गावात गवताची पेंड पेटवून त्यावरून गुरं ओलांडून नेली जातात. ही एक प्राचीन परंपरा आहे. असे केल्याने जनावरांच्या अंगावरील कीटक आणि जंतू मरतात, त्यांना कोणत्याही रोगाची लागण होत नाही आणि आगामी वर्षभर त्यांचे आरोग्य चांगले राहते, अशी शेतकऱ्यांची श्रद्धा आहे.

### ■ 2. राखेच्या रांगोळ्या आणि पारंपरिक पणत्या

ग्रामीण भागातील दिवाळी आठवडाभर आधीच सुरू होते. दिवाळीच्या काळात घराच्या अंगणात आणि भोवताली राखेने रांगोळ्या काढल्या जातात. या रांगोळ्या धान्यांनी घर भरून जावे या सूचक पद्धतीने काढलेल्या असतात. शहरांत आकर्षक विद्युत रोषणाई दिसत असली तरी, जिल्ह्यातील अनेक गाव-खेडी, पाड्यांत आजही मातीच्या पणत्या (दिवे) लावून परिसर प्रज्वलित करण्याची पूर्वापार चालत आलेली परंपरा जोपासली जाते. पणत्या स्वच्छ करून त्या तेला-तुपाने पेटवल्या जातात, ज्यामुळे एक शांत आणि पारंपरिक सौंदर्य अनुभवता येतो.

### ■ 3. नरकचतुर्दशीला 'चिरांट' फळ फोडणे

महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी नरकचतुर्दशीच्या दिवशी अभ्यंगस्नानापूर्वी डाव्या पायाच्या अंगठ्याने 'चिरांट' नावाचे कडू फळ फोडण्याची परंपरा आहे. हे कडू फळ म्हणजे नरकासुराचे प्रतिकात्मक रूप मानले जाते. ते फोडून कटुता आणि दुष्टता नाहीशी व्हावी अशी प्रार्थना केली जाते. जंगल परिसरात वेलींवर उगवणारे हे 'चिरांट' फळ जंगलतोडीमुळे नामशेष होण्याच्या मार्गावर आहे, तरीही काही पारंपरिक भागात ही प्रथा आजही टिकून आहे.

## दिवाळीच्या निमित्ताने खाद्य संस्कृती (दिवाळीचा फराळ)

दिवाळी म्हणजे फक्त दिवे नव्हे, तर तो फराळाचा सण आहे. महाराष्ट्राच्या इतर भागांप्रमाणेच ठाणे जिल्ह्यातही पारंपरिक दिवाळी फराळाला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**पारंपरिक फराळ :** ठाणेकर घरांमध्ये चकली, शंकरपाळी (गोड आणि खारी), रवा लाडू, बेसन लाडू, चिवडा, करंजी आणि अनारसे यांसारखे पारंपरिक पदार्थ आवर्जून बनवले जातात.

**बाजारातील विविधता:**

आधुनिक युगात वेळ वाचविण्यासाठी अनेक जण महिला बचतगट किंवा खाद्य उत्पादक संस्था (उदा. ऋतू फूड्स) यांच्याकडून फराळ विकत घेतात. बाजारात मोतीचूर लाडू, लसूण शेव, पिवळी शेव यांसारखे विविध पदार्थही उपलब्ध असतात.

**पौष्टिक तृणधान्यांचा फराळ:** सध्या पौष्टिक तृणधान्यांच्या फराळाला (Nutritious Cereals Diwali Faral) महत्त्व दिले जात आहे. ठाणे शहरात कोकण विभागीय कृषी सहसंचालकांच्या कार्यालयामार्फत पौष्टिक तृणधान्यांच्या दिवाळी फराळाचे प्रदर्शन व विक्री आयोजित केले जाते. यामध्ये भरड धान्य, बाजरी, नाचणी यांपासून बनवलेल्या लाडू आणि अन्य पदार्थांचा समावेश असतो, जे आरोग्याच्या दृष्टीने उत्तम मानले जातात.

**स्थानिक खाद्य:** ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात, विशेषतः आदिवासी भागातील महिला बचतगट तांदळाच्या भाकऱ्या बनवून त्यांची आजूबाजूच्या हॉटेल्स आणि समारंभांना मोठ्या प्रमाणावर विक्री करतात. दिवाळीच्या निमित्ताने स्थानिक उत्पादनांना चालना देण्यासाठी हे खाद्य उपक्रम महत्त्वाचे ठरतात.



### दीपोत्सवानिमित्त वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम:

ठाणे शहर आणि जिल्ह्यामध्ये दिवाळीच्या निमित्ताने अनेक सार्वजनिक आणि सामाजिक उपक्रम राबविले जातात, ज्यामुळे सणाचे वातावरण अधिक उत्साहाचे आणि अर्थपूर्ण होते.

### 1. दीपोत्सव आणि रांगोळी स्पर्धा

चेंदणी कोळीवाडा दीपोत्सव: ठाण्यातील चेंदणी कोळीवाडा येथील अष्टविनायक चौकात दीपोत्सवाचा एक अभिनव उपक्रम हाती घेतला जातो. या कार्यक्रमाला भव्य स्वरूप प्राप्त होते. येथे शेकडो तरुण-तरुणी सहभागी होऊन अप्रतिम रांगोळ्या काढतात.

**लक्ष दिव्यांची रोषणाई:**

या रंगोत्सवाबरोबरच लक्ष दिव्यांनी संपूर्ण चौक उजळून निघतो, ज्यामुळे हा दीपोत्सव नयनरम्य बनतो. आकर्षक रंगसंगती आणि विविध सामाजिक विषयांवर आधारित रांगोळ्या हे येथील वैशिष्ट्य आहे.

**आतषबाजी:** दीपोत्सवानंतर होणारी फटाक्यांची आतषबाजी ठाणेकरांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू असते.

### 2. ऐतिहासिक स्थळी 'इतिहास मार्गदर्शन दीपोत्सव'

ठाणे जिल्ह्यातील (पूर्वीच्या पालघर जिल्ह्याच्या) ऐतिहासिक स्थळांवर दिवाळीच्या काळात एक अर्थपूर्ण उपक्रम राबवला जातो. यामध्ये किल्ले वसई मोहिमेचे दुर्गमित्र सहभागी होतात आणि ऐतिहासिक स्थळांना (उदा. शिरगाव कोट, माहीम कोट) भेट देतात. हा केवळ दीपोत्सव नसून, 'इतिहास मार्गदर्शन सफर' असते. या माध्यमातून ऐतिहासिक राजवटी, दैवते, वास्तू स्थापत्य, आणि मराठ्यांच्या शौर्याची गाथा यावर माहिती दिली जाते.

किल्ल्यातील ज्ञात-अज्ञात वीरांना मानवंदना देण्यासाठी दीपपूजन आणि स्वच्छता मोहिमा राबवल्या जातात, ज्यामुळे तरुणांमध्ये इतिहास आणि दुर्गसंवर्धनाबद्दल जागरूकता निर्माण होते.

### ■ 3. दिवाळी अंक प्रकाशन

दिवाळीच्या निमित्ताने साहित्य आणि संस्कृतीला चालना देणारे अनेक 'दिवाळी अंक' प्रकाशित होतात. ठाणे जिल्ह्यातूनही अनेक दिवाळी अंक प्रकाशित होतात. हे अंक वाचकांना उत्तम साहित्य पुरवतात आणि दिवाळीच्या आनंदात भर घालतात.

### ■ 4. सामाजिक उपक्रम

दिवाळीच्या निमित्ताने समाजात बंधुभाव आणि मदतीची भावना जपली जाते. अनेक संस्था आणि नागरिक गरजू, कष्टकरी लोकांच्या कुटुंबांना फराळ आणि कपडे देऊन त्यांच्या दिवाळीचा आनंद वाढविण्याचा प्रयत्न करतात. दिवाळी फराळ कार्यक्रमासोबतच “एक हात पूरग्रस्तांच्या मदतीकरिता” अंतर्गत “माणूसकीची दिवाळी” उपक्रम

यावर्षी अतिवृष्टीमुळे मराठवाड्यासह महाराष्ट्र राज्यातील अनेक भागातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यांना मदत करण्यासाठी म्हणून महाराष्ट्र शासनासह विविध संस्था, व्यक्ती पुढे सरसावले आहेत. ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयही या मदतकार्यात क्यू आर कोडच्या माध्यमातून पुढे सरसावले आहे. दिवाळीच्या पहिल्याच दिवशी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रुपाली भालके, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) सर्जेराव मस्के-पाटील, उपजिल्हाधिकारी (रोहयो) शशिकांत गायकवाड, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) वैशाली माने, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख नितीन पाटील, प्रांताधिकारी उर्मिला पाटील, तहसिलदार रेवण लेंभे, सचिन चौधर, संदीप थोरात, अमोल कदम, प्रदिप कुडाळ, उज्वला भगत, निलेश गौड, मुकेश पाटील, जिल्हा खनिकर्म अधिकारी विवेक घुले यांच्या पुढाकारातून जिल्हाधिकारी कार्यालय आणि सर्व प्रांत व तहसिल कार्यालय यांनी दिवाळी फराळ कार्यक्रमासोबतच “एक हात पूरग्रस्तांच्या मदतीकरिता” याअंतर्गत “माणूसकीची दिवाळी” हा उपक्रम राबविला. यावेळी मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या बँक खात्यावर क्यू आर कोडच्या माध्यमातून अधिकारी-कर्मचाऱ्यांनी स्वेच्छा निधी तात्काळ जमा केला.

ठाणे जिल्ह्यातील दिवाळी म्हणजे परंपरा आणि आधुनिकता, ग्रामीण कृषी संस्कृती आणि शहरी जीवनातील उत्साह यांचा एक सुंदर संगम आहे. गोधन पूजनाची अनोखी प्रथा, राखेच्या पारंपरिक रांगोळ्या, पौष्टिक फराळाची विविधता आणि दीपोत्सवाच्या माध्यमातून होणारे कला आणि इतिहास संवर्धनाचे उपक्रम यामुळे ठाण्याची दिवाळी खऱ्या अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण ठरते. हा केवळ सण नाही, तर कृतज्ञता, नवचैतन्य आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा एक मौल्यवान वारसा आहे.


तमसो मा जोतिर्गमय्
दिवाळी पाडवा
निमित्त सर्वांना मंगलमय शुभेच्छा..!
आपणांस आणि आपल्या परिवारास दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छूक
श्री. किसन कथोरे
(आमदार, मुरबाड विधानसभा मतदार संघ)